www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118




सिटीझन रिपोर्टर
बनण्याची सुवर्ण संधी
संपर्क करा
०२२ ६९७१ १८९०
dailylokrakshanay@gmail.com



दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ८५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार, ८ ऑगस्ट २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



राष्ट्रीय ध्वज प्रतिष्ठा अभियान
केअर फाऊंडेशन मुंबई द्वारा निर्धारित


## थोडक्यात

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून शिवस्वराज्य यात्रेची घोषणा

● पुणे, अभिजित येरल्लू :

काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज बुधवारी पत्रकार परिषद घेत 'शिवस्वराज्य यात्रा'ची घोषणा केली आहे. ही यात्रा ९ ऑगस्ट रोजी शिवनेरी किल्ल्यावरून सुरू होईल अशी माहिती देताना या यात्रेच्या माध्यमातून महायुती सरकारच्या काळ्या कारनाम्यांचा जनतेपुढे पर्दाफाश केला जाईल असे जयंत पाटील यांनी सांगितले

या पत्रकार परिषदेत जयंत पाटील यांनी शिवस्वराज्य यात्रेचा टिझर व लोगोही प्रसिद्ध केला. यावेळी पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे स्टार प्रचारक तथा खासदार अमोल कोल्हे, ज्येष्ठ नेते तथा आमदार अनिल देशमुख, ज्येष्ठ नेते तथा आमदार राजेश टोपे व सुनील भुसारे तसेच आमदार रोहित पवार आदी नेते उपस्थित होते.

याबाबत सविस्तर बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात युतीचे सरकार आल्यापासून राज्य अधोगतीकडे गेलेले आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडली आहे. शेजारचे राज्य आपल्या तरुणांच्या हातचे काम हिसकावून घेत आहेत. हे सर्व सुरू असताना राज्यकर्ते हतबलपणे बसले आहेत. पान २ वर

### वार्षिक उद्योग पाहणी सन २०२२-२३ च्या क्षेत्रकामाची कार्यशाळा

● ठाणे, सम्यक कासारे :

ठाणे (जिमाका) :- वार्षिक उद्योग पाहणी क्षेत्रकामासंबंधी संकल्पना सुस्पष्ट होण्याच्या आणि क्षेत्रकामादरम्यान संकलित केलेल्या आकडेवारीची गुणवत्ता उंचाविण्याच्यानुषंगाने अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालय / जिल्हा सांख्यिकी कार्यालयातील सर्व क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांची तीन दिवसीय निवासी कार्यशाळा दि.०७ते०९ऑगस्ट,२०२४ या कालावधीमध्ये यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे अध्यक्षपद शेखर गायकवाड, अतिरिक्त महासंचालक, यशदा यांनी भूषविले. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, उप महासंचालक, यशदा, पुणे, डॉ. पाणिग्रही, संचालक, औद्योगिक सांख्यिकी विभाग, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार, कोलकत्ता, अलोक कुमार, संचालक, क्षेत्रिय कार्यालय, राष्ट्रीय नमूना पाहणी कार्यालय, पुणे, कृष्णा फिरके, संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, अमोल खंडारे, सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, दिपाली धावरे, उप संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, इ. वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणातून रोजगार, मूल्यवृद्धी, भांडवल निर्मिती, इ. अर्थव्यवस्थेच्या विविध महत्त्वाच्या निर्देशांकांची माहिती गोळा करण्यात येते व ती राज्याच्या आणि जिल्ह्यांच्या उत्पन्नाच्या अंदाजामध्ये महत्त्वाची ठरते.

## म्हाडाकडून 2030 घरांसाठीची सोडत जाहीर



● मुंबई, विशाल कारंडे :

म्हाडा मुंबई मंडळातर्फे २०३० सदनिकांच्या विक्रीकरिता सोडत जाहीर करण्यात आली आहे. मुंबईतील पहाडी गोरेगाव, अँटॉप हिल-वडाळा, कोपरी पवई, कन्नमवार नगर-विक्रोळी, शिवधाम कॉम्प्लेक्स-मालाड इ. गृहनिर्माण प्रकल्पामधील विविध उत्पन्न गटातील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी सोडत जाहीर करण्यात आली आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेला ०९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजेपासून प्रारंभ होणार आहे. पान २ वर

### अर्ज कधी करायचा? मुदत कधीपर्यंत ?

सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या शुभहस्ते शुक्रवार 'गो लाईव्ह' समारंभाद्वारे प्रारंभ केला जाणार आहे. यानंतर सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याची लिंक मंडळाद्वारे दुपारी १२.०० वाजेपासून उपलब्ध राहील. तसेच नोंदणीकृत अर्जदार देखील ऑनलाईन अर्ज करू शकणार आहेत. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक ०४ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत आहे. तसेच ऑनलाईन अनामत रकमेची स्विकृती दिनांक ०४ सप्टेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत केली जाणार आहे. सोडतीसाठी प्राप्त अर्जाची प्रारूप यादी दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून ऑनलाईन दावे व हरकती दाखल करण्यासाठी दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. सोडतीसाठी स्वीकृत अर्जाच्या अंतिम यादीची प्रसिद्धी दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत केली जाणार आहे.

## कडोंमपातील ११८ हेक्टर सरकारी जागेवर अतिक्रमण

### कल्याणच्या तहसीलदारांची उच्च न्यायालयात माहिती

● ठाणे, रोहित जैसवार :




कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील राज्य सरकारच्या मालकीच्या ११८.१८ हेक्टर जागेवर अतिक्रमणे असल्याची माहिती कल्याणच्या तहसीलदारांनी उच्च न्यायालयात दिली आहे. तसेच, ही अतिक्रमणे हटवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात असल्याचा दावाही त्यांनी न्यायालयात केला. तथापि, बेकायदा बांधकामांवरील कारवाईबाबत तहसीलदार आणि महापालिकेने काहीच माहिती सादर केली नसल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली व २० मार्चपासून केलेल्या कारवाईचा तपशील सादर करण्याचे आदेश दिले.

कल्याण डोंबिवली महापालिका आणि राज्य सरकारच्या मालकीच्या जमिनींवर १.६५ लाख बेकायदेशीर बांधकामे असल्याचा आरोप स्थानिक रहिवासी हरिश्चंद्र म्हात्रे यांनी जनहित याचिकेद्वारे केला आहे. या याचिकेची दखल घेऊन न्यायालयाने जानेवारी महिन्यात महापालिकेला बेकायदा बांधकामे आणि अतिक्रमणे पाडण्याची कारवाई करण्यासह भविष्यात ही बांधकामे होणार नाही यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश दिले होते. त्याचवेळी, अतिक्रमणांची संख्या आणि त्यावरील कारवाईचा तपशील सादर करण्याचे आदेशही महापालिका आणि सरकारला दिले होते. पान २ वर

## तू हार मानणाऱ्यांमधील नाही, संपूर्ण देश तुझ्या पाठीशी! - राहुल गांधी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



भारताची स्टार कुस्तीपटू विनेश फोगाटला पॅरिस ऑलिम्पिमध्ये अपात्र ठरवण्यात आल्यामुळे भारताला मोठा धक्का बसला आहे. ५० किलो वजनी गटात ती फायनलमध्ये पोहोचली होती. सलग चारवेळा विश्वविजेती आणि टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक विजेत्या जपानच्या युई सुसाकीला तीने मात दिली होती होती, त्यामुळे तिंच गोल्ड मेडल निश्चित मानलं जात होतं. मात्र आज निर्णय आला आणि संपूर्ण देशाला धक्का बसला.दरम्यान लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं असून विनेश फोगाटला अपात्र घोषीत करणे दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.

## दादर सुटकेस प्रकरणाचा २४ तासांत छडा

● मुंबई, विशाल पाटील :



दादरमधील सुटकेस प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. याप्रकरणाचा २४ तासांत छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. दोन्ही आरोपींच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत. पायधुणी येथे अर्शद अली शेखची रविवारी हत्या करण्यात आली होती. त्याचा मृतदेह बॅगेमध्ये भरून विल्हेवाट लावण्यासाठी आरोपी तुतारी एक्स्प्रेसने कोकणात जाण्याच्या प्रयत्नात होता. पण दादर रेल्वे स्थानकावर त्याच्यावर संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं. पोलिसांनी बॅगेची तपासणी केली असता त्यामध्ये मृतदेह आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी आरोपीची चौकशी केली असता संपूर्ण घटनेचा उलगडा झाला. दादर रेल्वे स्थानकात लाल रंगाच्या ट्रॉली बॅगेमध्ये मिळालेल्या मृतदेहाप्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. मुक आणि कर्ण बधीर अर्शद अली शेखची (३० वर्षे) त्याच्याच दोन मित्रांनी निर्घृण हत्या केली. आरोपींनी अर्शदची हत्या करताना आपल्या मित्रांना व्हिडीओ कॉल केला होता. अर्शदच्या हत्येचा व्हिडीओ सामच्या हाती लागला आहे. नग्न करून आणि हात-पाय बांधून आधी अर्शदला अमानुष मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्याची हत्या करण्यात आली. हत्येनंतर त्याचा मृतदेह बॅगेमध्ये भरून त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न आरोपींनी केला. पण त्यापूर्वीच पोलिसांनी आरोपींना अटक केली. हत्या करण्यात आलेला अर्शद अली सादीक शेख आणि आरोपी जय चावडा आणि शिवजीत सिंह हे तिघेही मित्र होते. पान २ वर

## खैर तस्करांवर कारवाई करण्याऐवजी तक्रारदाराला सातबारा व नकाशा देण्याची मागणी

● महाड, दिगंबर जाधव :

महाड तालुक्यात दिवसेंदिवस वनखात्याच्या भोंगळ कारभारामुळे वारे माप वृक्षतोड होत आहे त्यातच खाजगी जागेतील खैराटी वृक्षतोड केल्याबद्दल आरोपींवर कारवाई करण्याऐवजी तक्रार करणाऱ्याच व्यक्तीला जागेचा सातबारा व नकाशा आणा मगच कारवाई करतो असे उत्तर महाडच्या वनखात्याने दिल्याने आंधळं दळतय कुत्र पीठ खातय असा वन खात्याचा कारभार झाल्याची प्रतिक्रिया तक्रारदाराने व्यक्त केली आहे महाड तालुक्यातील विन्हेरे विभागातील वसाहब गावातील प्रमोद मोहन दळवी यांच्या खाजगी मालिकेतील गट क्रमांक 31 मधील शेतमाळया लागत असलेल्या जमिनीतील खैराचे झाड तोडून नेल्याची घटना तीन ऑगस्ट रोजी घडली वसाप गावातील शेतकरी प्रमोद दळवी यांच्या खाजगी मालिकेतील गट नंबर 31 मधील घराच्या वृक्षांची स्टोरी बबन महिपती वाघमारे व सुरेश महिपती वाघमारे राहणार कुंभार्डे आदिवासी वाडी येथील रहिवाशांनी केल्याचे नितीन रमेश यादव राहणार विन्हेरे बौद्धवाडी यांनी पाहिले असल्याचे दळवी यांनी वन खटाकडे केलेल्या तक्रारी अर्जात म्हटले आहे. पान २ वर

## बुलढाणा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील पिक विमा काढलेल्या अपात्र शेतकऱ्यांना विम्याची रक्क्कम तातडीने द्यावी - कृषी मंत्री धनंजय मुंडे

● मुंबई, नितीन देवळेकर :

चंद्रपूर व बुलढाणा येथे झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व शेतीचे नुकसान झाले आहे. ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे, अशा सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तसेच इतर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी अंतर्गत नुकसानभरपाई देण्यासंदर्भातील कार्यवाही तातडीने करण्यात यावी. ज्या शेतकऱ्यांना पीक विमा कंपन्यांनी मर्यादित कालावधीत कारणे न देता अपात्र ठरविले आहे, अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पात्र ठरवून विमा रक्कम अदा करण्यासंदर्भात ३१ ऑगस्ट पर्यंत कार्यवाही करण्याचे निर्देशही कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.

मंत्रालयात चंद्रपूर आणि बुलडाणा जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरिप आणि रब्बी पिकासंदर्भात संबंधित कंपन्यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा कृषीमंत्री श्री मुंडे यांनी घेतला.यावेळी मंत्री वन सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीसंदर्भात माहिती दिली आणि सर्व पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशा सूचना कंपनी प्रतिनिधींना दिल्या. पान २ वर

## राज्यसभेच्या १२ जागांसाठी ३सप्टेंबर रोजी निवडणूक

### महाराष्ट्रातील पियुष गोयल व उदयनराजे भोसले यांच्या रिक्त जागांवर कोणाची वर्णी, भाजपामध्ये चढाओढ !

● मुंबई, दिगंबर जाधव :



लोकसभा निवडणुकीत निवडून आलेल्या व रिक्त असणाऱ्या राज्यसभेच्या १३ जागांसाठी ३सप्टेंबर रोजी मतदान होत असून महाराष्ट्रातील पियुष गोयल व उदयनराजे भोसले या दोन जागांचा देखील यात समावेश असून महाराष्ट्रातील या दोन जागांवर उमेदवारी मिळवण्यासाठी भाजपा चढाओढ चालल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे राज्यसभेवर निवडून द्यायच्या १२ जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून १४ऑगस्ट रोजी या निवडणुकीची अधिसूचना जाहीर होईल२१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील २२ ऑगस्ट रोजी दाखल केलेल्या अर्जांची छाननी होईल तर आसाम मध्य प्रदेश ,महाराष्ट्र व त्रिपुरा या राज्यांसाठी २६ ऑगस्ट रोजी तर बिहार, हरियाणा ,राजस्थान व तेलंगणा या राज्यांसाठी २७ऑगस्ट रोजी अर्ज मागे घेण्याची मुदत असेल तर ३ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ ते चार या वेळेत मतदान असेल तर सायंकाळी पाच नंतर मतमोजणी चालू होईल पान २ वर

## कारवर हल्ला करणाऱ्यांना मुख्यमंत्र्यांचं अभय आहे का?

### आमदार मिटकरी यांचे CM शिंदेंवर गंभीर आरोप

● अकोला, सचिन कदम :

मनसे आणि राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांच्यातील वाद मिटतांना दिसत नाही. मनसे नेते आणि मिटकरी यांच्याकडून आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. अशात अमोल मिटकरी यांनी त्यांच्या कारवरील हल्लाप्रकरणी मुख्यमंत्री शिंदेंवर गंभीर आरोप केलेत. या प्रकरणातील आरोपींना मुख्यमंत्र्यांचं अभय आहे का?, असा प्रश्न आमदार अमोल मिटकरींनी मुख्यमंत्र्यांना केलाय.



राज ठाकरे यांच्यावर टीका केल्याप्रकरणी मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. त्यांनी ३० जुलैला अकोल्याच्या शासकीय विश्रामगृहाबाहेर अमोल मिटकरी यांच्या कारवर हल्ला चढवला होता. यावेळी मिटकरी यांच्या कारच्या काचा फोडण्यात आल्या होत्या. यावेळी झालेल्या राड्यात सहभागी असलेले मनसेचे स्थानिक पदाधिकारी कर्णबाळा दुनबाळे अजूनही फरार आहेत. त्यांना मुख्यमंत्र्यांकडून अभय दिले जात असल्याचा आरोप मिटकरी यांनी आता केलाय. राज ठाकरे आणि मुख्यमंत्र्याच्या भेटीमध्ये कुठेतरी पाणी मुरलंय. अकोला पोलीस कर्णबाळाचा शोध का घेत नाही? असा सवाल मिटकरींनी उपस्थित केलाय.पोलिसांच्या कार्यक्षमतेवर संशय उपस्थित करत तुमच्यावर मुख्यमंत्र्यांचा दबाव आहे का? असा सवाल मिटकरी यांनी पोलीस यंत्रणेला विचारलाय.

एका आमदारावर हल्ला होतो, मुख्यमंत्री साधी विचारणा करत नाही. याचा अर्थ मुख्यमंत्र्यांचं माझ्यावर प्रेम नाही अथवा कमी झालंय, असेही अमोल मिटकरी म्हणालेत.

दरम्यान काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राड ठाकरे यांची भेट झाली होती. त्या भेटीवरुन मिटकरी यांनी मुख्यमंत्री शिंदेंवर गंभीर आरोप केलेत. मुख्यमंत्री आणि राज ठाकरे याच्या दोन तासांच्या झालेल्या बैठकीत आपल्या विरोधात काही शिजलंय का? त्यामुळे त्या प्रकरणातला प्रमुख सूत्रधार कर्णबळा दुनबळेला अटक होत नाहीय, असा आरोप आमदार अमोल मिटकरी यांनी मुख्यमंत्र्यांवर केलाय. या प्रकरणानंतर मुख्यमंत्र्यांनी एकदाही आपली साधी विचारपूस केली नसल्याची खंतही आमदार अमोल मिटकरी यांनी यावेळी व्यक्त केली.

दरम्यान, मनसे प्रवक्ते योगेश चिले यांनी केलेल्या आरोपांनाही मिटकरी यांनी उत्तर दिलंय. योगेश चिले हा खंडणीबहाद्दर आहे. पनवेल परिसरात चिलेंनी अनेक कंत्राटदारांकडून खंडणी वसूल केल्याचा आरोप मिटकरींनी केलाय. योगेश चिले हा राज ठाकरे आणि अमित ठाकरे यांच्या नावाने राजगडावर बसून कंत्राटदारांकडून खंडण्या वसूल करत असल्याचा गंभीर आरोप आमदार मिटकरी यांनी केलाय. या संदर्भातील अनेक ठोस पुरावे आपल्याकडे असून लवकरच पनवेल येथे जाऊन पत्रकार परिषद घेणार असल्याचं आमदार अमोल मिटकरी म्हणाले.

## अल्पसंख्याक संस्था संघटनांनी मानले उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांचे आभार

■ राज्यातील अल्पसंख्यांकांचे मागासलेपण दूर होऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या प्रयत्नांना वेग येणार उपमुख्यमंत्री अजित पवार

■ मार्टीसाठी ११ पदांसह ६.२५ कोटींच्या खर्चास मान्यता उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांची माहिती



● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय'ची (मार्टी) स्थापना करण्याचा राज्य मंत्रिमंडळाने आज घेतलेला निर्णय म्हणजे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नांचे यश असल्याचे सांगत राज्यातील अनेक मुस्लिम तसेच अल्पसंख्यांक बांधवांच्या संस्था, संघटनांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन केले आहे.

राज्यातील मुस्लिम तसेच अल्पसंख्याक बांधवांच्या विकास योजनांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्याच प्रयत्न व पाठपुराव्यामुळे राज्यसरकारने अल्पसंख्याक आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला असून त्याची कार्यवाही सध्या अंतिम टप्प्यात आहे.

पान २ वर

## संपादकीय


### वायनाडचे धडे

केरळमधील वायनाड या जिल्ह्यातील मुंडाक्काई परिसरात मंगळवारी पहाटे दरड कोसळून झालेल्या भूस्खलनात ९३ पेक्षा जास्त लोकांचा जीव गेला. या भागातील गेल्या २४ तासांतील प्रचंड पावसामुळे ही घटना घडली असे आता सांगितले जात आहे. निसर्गावर सारा दोष ढकलून स्वतः नामानिराळे राहण्याच्या आपल्या या सवयीचे दर्शन वर्षभरापूर्वी इर्शाळवाडीत झाले. त्याआधी माळीणला झाले. तरीही नैसर्गिक संरचना बदलून टाकण्याचे मानवी खटाटोप सुरुच आहेत. अशा दुर्दैवी घटनांमध्ये बळी गेले की त्यांना भरपाई द्यायची. गाडल्या गेलेल्या गावांचे पुनर्वसन करायचे याला कर्तव्य म्हटले की राज्यकर्तेही हात झटकून मोकळे होतात. पण पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पश्चिम घाट परिसरात मानवी हस्तक्षेप नको अशी ठाम भूमिका आपण कधी घेणार?

हा घाट असो वा अशी नैसर्गिक समृद्धी असलेला आणखी कुठलाही परिसर. तेथील डोंगर, दऱ्या, दरडी यांना विकासाच्या नावाखाली हात लावणे, त्यांच्या संरचनेत बदल करणे ही मानवी घोडचूक आहे. जे आपण निर्माणच केलेले नाही, करूही शकत नाही, त्याचा विध्वंस करायचा अधिकार आपल्याला कुणी दिला ? आपण निसर्गावर मात करू शकतो या अहंकारातून माणूस हे सगळे करतो आहे. त्याची कटू फळे म्हणजे अशा दुर्घटना. दरवर्षी होणारे त्यांचे दुष्परिणाम पाहूनही माणसाची विकासाची हाव तसूभरही कमी व्हायला तयार नाही. पर्यटनाच्या नावाखर डोंगर खोदून केले जाणारे रस्ते, विकासकामांसाठी खनिज हवे म्हणून खोदल्या दगड व गिट्टीच्या खाणी, त्यानिमित्ताने होणारी बेसुमार वृक्षतोड यामुळे पश्चिम घाट अनेक ठिकाणी पोखरला गेला आहे. एका आकडेवारीनुसार केरळमध्ये निलगिरी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका घाटात सहा हजार खाणी आहेत आणि त्यात्याचा केवळ ७५० अधिकृत आहेत. या खाणींनी सात हजार १५७ हेक्टर जंगलक्षेत्राचा ऱ्हास केला आहे. या व्यवसायात स्थानिकांपासून नेत्यांपर्यंत साऱ्यांचे हात गुंतलेले आहेत आणि या साऱ्यांना प्रशासनाची साथ आहे. यांच्या उद्योगांतून प्रत्येक डोंगर आणि दरडीवरचे सच्छिद्र खडक, नंतर कठीण खडक आणि सर्वांत शेवटी झरे ही मजबुतीसाठी असलेली नैसर्गिक ठेवणच विस्कळीत झाली आहे. अशा स्थितीत दरडी कोसळणार नाही तर आणखी काय होणार ?

या घाटातील अनेक गावांची रचना पूर्वी एका रेषेत घरे आणि मधून जाणारा रस्ता अशीच असायची. नंतर यात बदल होत गेले. आणखी उंचावर घर हवे म्हणत लोक डोंगर पोखरू लागले. पर्यटनातून पैसा कमवायचा असेल तर घाटाच्या आत आणखी रस्ते हवेत म्हणून ठिकठिकाणी खोदकाम सुरु झाली. यातून पर्यावरणाची हानी झालीच, पण नैसर्गिक संरचना कमकुवत झाली. त्याचा परिणाम दरडी कोसळण्यात झाला. गेल्या सात वर्षांत देशभरात अशा चार हजारांवर घटनांची नोंद झाली आहे. हे केवळ दक्षिणेत आणि पश्चिमेत घडले असेही नाही. देशाच्या उत्तरेकडेही हेच प्रकार आहेत. उत्तराखंड, हिमाचल या राज्यांनी अलीकडच्या काळात अनुभवलेल्या अशाच नैसर्गिक प्रकोपातही अनेकांनी आपला जीव गमावला. केरळमधील वायनाड, इडुकी, कन्नूर, मल्लापूरम परिसरात होणाऱ्या वैध व अवैध उत्खननाविरुद्ध राष्ट्रीय हरित लवादाने अनेकदा कडक ताशेरे ओढले. काही प्रकरणात तर बंदीही आणली, पण त्याकडे साफ दुर्लक्ष करून पर्यावरणाला हानी पोहोचवण्याचे हे काम सुरूच राहिले. पृथ्वी, तिच्यावरची जंगले, डोंगर, नद्या, समुद्र, इतर वन्यजीव ही निसर्गसंपदा फक्त आपल्या उपभोगासाठी आहे, असा मूर्ख आणि अहंमन्य समज घेऊन माणूस आजमितीला पृथ्वीवर वावरतो आहे. त्यातही तथाकथित विकासाची स्वप्ने पाहणारे तर फक्त या स्वप्नांचेच नाही, तर पृथ्वीचेच सौदागर होऊ पाहात आहेत. या सगळ्याचा मोठा फटका आपल्या पुढच्या पिढ्यांना बसणार आहे.

आपल्या पूर्वजांनी ही सगळी निसर्गसंपदा वारसा म्हणून आपल्याकडे सोपवली आहे. ती तशीच पुढच्या पिढ्यांकडे सोपवणे, ही पृथ्वी त्यांच्यासाठी आनंददायक असेल असे पाहणे, इतर वन्यजीवांचा तिच्यावरचा अधिकार मान्य करणे हे आपले काम. आपण केवळ विश्वस्त. पण तिच्याच डोंगर खोदून, या बुजवून आणि नदीची पात्रे वळवून दाखवणे यातच आपल्याला पुरुषार्थ वाटतो आहे. त्यात राज्यकर्ते अग्रेसर दिसू लागल्यावर सामान्य लोक कशाला मागे राहतील? यातून ऱ्हास झाला आहे तो संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरांचा, वायनाडसारख्या दुर्घटनांमागील खरे कारण हे आहे. त्याकडे दुर्लक्ष करून केवळ पावसाला दोष देणे, कमी वेळात जास्त पाऊस झाला त्याला काय करणार असे म्हणत हात झटकणे हा पळपुटेपणा झाला. आपण तो आणखी किती काळ करत राहणार हा खरा प्रश्न आहे.



### आजची चित्रोळी

ओघळलेली फुलें टपोरी
पानांनी झेलली !
कधीं ओंजळीं भरून मीहि
नाकानें हुंगली !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### म्हाडाकडून २०३० घरांसाठीची सोडत जाहीर

या सोडतीची जाहिरात ०८ ऑगस्ट, २०२४ प्राप्त अर्जाची संगणकीय सोडत दिनांक १३ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता काढण्यात येणार असून सोडतीचे ठिकाण मंडळातर्फे लवकरच जाहीर केले जाईल. रोजी राज्यातील विविध वृत्तपत्रात येणार आहे. तसेच म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मुंबई मंडळाच्या सन २०२४ च्या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटासाठी ३५९ सदनिका, अल्प उत्पन्न गटासाठी ६२७ सदनिका, मध्यम उत्पन्न गटासाठी ७६८ सदनिका, उच्च उत्पन्न गटासाठी २७६ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या सोडतीत म्हाडाच्या मुंबई मंडळाने बांधलेल्या १३२७ सदनिका, विकास नियंत्रण नियमावली ३३ (५), ३३ (७) व ५८ अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पातून विकासकांकडून गृहसाठा म्हणून म्हाडाला प्राप्त ३७० सदनिका (नवीन व मागील सोडतीतील सदनिका) व मागील सोडतीतील विविध वसाहतीतील विखुरलेल्या ३३३ सदनिकांचा समावेश आहे.

अँड्रॉइड अथवा आयओएस (ios) या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिमवर अनुक्रमे गुगल प्ले स्टोअर आणि ॲप स्टोअरमध्ये Mhada Housing Lottery System या नावे मोबाइल ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच अर्जदाराच्या सोयीकरिता https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील अर्ज नोंदणी, अर्ज भरणा व पेमेंट प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदारांना नवीन संगणकीय प्रणालीची माहिती देणारी मार्गदर्शनपर माहिती पुस्तिका, ध्वनीचित्रफिती आणि हेल्प फाईल या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्यापूर्वी अर्जदारांनी या मार्गदर्शनपर माहिती पुस्तिकेचे अवलोकन करावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

मर्यादा आहे. अल्प उत्पन्न गटासाठी रुपये नऊ लाखापर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा आहे. मध्यम उत्पन्न गटासाठी रुपये बारा लाखापर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा आहे. उच्च उत्पन्न गटासाठी रुपये बारा लाखांहून अधिक वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्यांचा समावेश असणार असून या गटासाठी कमाल मर्यादा ठेवण्यात आलेली नाही. अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती मध्यम व उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती केवळ उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात.

सदनिकांच्या वितरणासाठी म्हाडाने कोणत्याही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये तसे केल्यास मुंबई मंडळ कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही, असे आवाहन म्हाडातर्फे करण्यात येत आहे.

### कर्डोमपातील ११८ हेक्टर सरकारी जागेवर...

त्या पार्श्वभूमीवर, महापालिकेने आणि तहसीलदारांनी प्रतिज्ञापत्र दाखल करून अतिक्रमणांची माहिती सादर केली.

बेकायदा बांधकामे हटवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच भाग म्हणून गावपातळीवरील सर्व अधिकाऱ्यांना कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश देण्यात आल्याचा दावा तहसीलदारांनी प्रतिज्ञापत्रात केला. तथापि, प्रतिज्ञापत्रात केवळ बेकायदेशीर बांधकामांचा उल्लेख करण्यात आला आहे, कारवाईचा नाही याकडे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने लक्ष वेधले. तसेच, २० मार्चपासून अतिक्रमण हटविण्यासाठी काय कारवाई केली हे प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट करण्याचे आदेश उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले. प्रतिज्ञापत्रात, कोणते क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले आहे आणि तोडण्यात आलेल्या बेकायदा बांधकामांच्या संख्येचा तपशील सादर करण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.यापूर्वी, महापालिका हद्दीतील आठ बेकायदा इमारतींवर कारवाई करण्यास सुरुवात केल्याची माहिती महापालिकेने न्यायालयाला दिली होती. त्यामुळे, या इमारतींवरील कारवाईबाबत न्यायालयाने महापालिकेकडे विचारणा केली. त्यावर, इमारती रिकाम्या करण्यास नकार देणाऱ्या रहिवाशांना नोटिसा बजावल्या आहेत. तसेच, इमारती रिकाम्या करतेवेळी पोलीस संरक्षणाची मागणी करण्यात आल्याचे न्यायालयाला सांगितले. परंतु, केवळ या बांधकामांवरच नाही, तर महापालिका हद्दीतील इतर बेकायदेशीर बांधकामांवरही काय कारवाई केली हे स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

### दादर सुटकेस प्रकरणाचा २४ तासांत छडा

तिघेही मूकबधिर होते. क्रिकेट खेळताना त्यांच्यामध्ये मैत्री झाली होती. हे तिघेही नेहमी एकमेकांना भेटत होते. रविवारी रात्री तिघांनी जयच्या घरी भेटण्याचा प्लान केला. तिघेही दारू प्यायला बसले होते. त्याचवेळी शिवजीत आणि अर्शद यांचे भांडण झाले. या भांडणानंतर संतापलेल्या शिवजीतने अर्शदचे हाय-पाय बांधले, त्याचे कपडे काढले. नग्न करून त्याला बेदम मारहाण केली. जयने व्हिडीओ कॉल करत इतर मित्रांना अर्शदची हत्या लाइव्ह दाखवली.शिवजीत मारहाण करत असताना अर्शद त्याच्याकडे हात जोडून विनंती करत होता. पण तो काही ऐकत नव्हता. अतिशय निर्दयीपणे तो त्याला मारहाण करतच राहिला. शिवजीतने जयच्या घरामध्ये पडलेल्या हातोडीने अर्शदच्या डोक्यावर वार केले. या मारहाणीमध्ये गंभीर जखमी झालेल्या अर्शदचा जागीच मृत्यू झाला. हत्येनंतर शिवजीतने जयला धमकावत अर्शदच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यास सांगितले. जय एका बॅगेत अर्शदचा मृतदेह भरून दादर रेल्वे स्थानकावर गेला. त्याठिकाणी त्याने तुतारी एक्स्प्रेसने कोकणात जाण्याचा प्रयत्न केला पण त्यापूर्वीच पोलिसांनी त्याला अटक केली.रविवारी रात्री उशिरा दादर रेल्वे स्थानकात बॅगेत मृतदेह सापडल्याने दादर रेल्वे स्थानक परिसरात खळबळ उडाली होती. अर्शदच्या हत्येप्रकरणी जय चावडा आणि शिवाजित सिंग यांना अटक करण्यात आली आहे. शिवजीत सिंग्च्या मैत्रिणीला अर्शद अली त्रास देत असल्याच्या संशयावरून आणि पैश्याच्या वादातून हत्या केल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिस आरोपींची कसून चौकशी करत असून सर्व बाजूने तपास करत आहेत. दोन्ही आरोपी देखील मुक आणि कर्ण बधीर असल्याने तपासात पोलिसांना अनेक अडथळे येत आहे.

### खैर तस्करांवर कारवाई करण्याऐवजी...

याबाबत व्हाट्सअप गावातील पोलीस पाटील सौ सुवर्णा सुनील केकेकर यांनी 5 ऑगस्ट रोजी गावातील रहिवाशांबरोबर एकत्रितरित्या जाऊन त्या जागे पंचनामा केला असता त्या जागा वेस्ळ खैराच्या वृक्षाची अनधिकृत उद्या तस्करी केल्याचे उघड झाले आहे याबाबत प्रमोद दळवी यांनी महाड येथील वनखात्याच्या उपवन संरक्षक कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला असता खैर तस्करांवर कारवाई करण्याऐवजी तक्रारदाराला संबंधित जागेचा सातबारा व जागेचा नकाशा काढून आणा मगच प्रत्यक्ष येऊन पाहणी करून कारवाई करू अशा अजब उत्तर दिल्याने आंधळं दळते कुत्र पीठ खाते असा महाडच्या उपवन संरक्षक कार्यालयाचा कारभार चालत असल्याचे या तक्रारदाराच्या बोलण्यातून स्पष्ट झाले आहे

### बुलढाणा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील पिक विमा...

बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगाम 2023 चे 119 कोटी तर खरीप हंगामातील 55 कोटी रुपये तर चंद्रपूर जिल्ह्यातील प्रलंबित १२७ कोटी ७४ लाख रूपये शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. याबद्दल सर्वच लोकप्रतिनिधी यांनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचे आभार मानले.

कृषीमंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, चंद्रपूर जिल्ह्यातील खरीप हंगामातील प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत ओरिएन्टल विमा कंपनीकडे एकूण ३ लाख ५० हजार ९६९ शेतकरी अर्जाद्वारे सहभागी झाले आहेत. विमा कंपनीने ३ लाख ४१ हजार २३३ पात्र ठरवलेल्या शेतकऱ्यांना तातडीने निधी वितरीत करावा. तसेच, मानवी दृष्टीने आणि अपात्रतेची कारणे वेळेत शेतकऱ्यांना न दिल्याने संबंधित ९७३६ शेतकऱ्यांना तातडीने पात्र ठरवून त्यांना विमा रक्कम अदा करावी. त्यांना भरपाईपोटी २०८ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ८० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले असून १२७ कोटी रुपये वाटप करण्याची प्रक्रिया सुरु आहे.तसेच बुलडाणा जिल्ह्यातील स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत २०५१ शेतकऱ्यांच्या सूचना प्राप्त असून, २०३० शेतकऱ्यांचे सर्वेक्षण झाले आहे. ज्या शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केले नाही, त्याची कारणे तत्काळ सादर करावीत. तसेच अपात्र ठरविलेल्या १३१८ शेतकऱ्यांनाही भारतीय कृषी विमा कंपनीने पात्र ठरवून त्यांना विमा रक्कम अदा करावी. दोन्ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने संबंधित कंपन्यानी तातडीने कार्यवाही करावी अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्याच्या सूचना मंत्री श्री.मुंडे यांनी दिल्या.

बुलढाणा जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांकडून पिक विमाबाबत हरकती दाखल करण्यास ७३ तासांपेक्षा जास्त उशीर झाला असेल किंवा तसेच ज्या शेतकऱ्यांनी ऑफलाइन तक्रारी दाखल केल्या असतील त्या सर्व तक्रारी ग्राह्य धरून ३१ ऑगस्टपर्यंत अपात्र ठरलेल्या सर्व शेतकऱ्यांना पात्र ठरवून विम्याची रक्कम अदा करण्याचे आदेश कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.

या बैठकीस केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, माजी मंत्री आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे, आमदार संजय रायमूलकर, आमदार श्वेता महाले, आमदार आकाश फुंडकर, आमदार संजय गायकवाड, आमदार डॉ.संजय कुटे, कृषी विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा, उपसचिव प्रतिभा पाटील, उपसचिव नीता शिंदे, भारतीय कृषी विमा कंपनीचे क्षेत्रीय व्यवस्थापक मच्छिन्द्र सावंत, कृषी आयुक्तालयाचे वैभव तांबे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज कुमार ढगे, भारतीय कृषी विमा कंपनीचे उपप्रबंधक सचिन हराळ, ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे अभिजित उद्धव आदी मान्यवर उपस्थित होते.

### राज्यसभेच्या १२ जागांसाठी ३सप्टेंबर रोजी...

कोणत्या राज्यातून किती जागा भरायचे आहेत त्याचा तपशील पुढील प्रमाणे; कामाख्या प्रसाद तसा व सरबा नंदा सोनवाल या दोन जागा आसाम राज्यातून तर मिसा भारती व विवेक ठाकूर या दोन जागा बिहार मधून तर दिपेंद्र सिंग होंडा हरियाणा मधून व ज्योतिरादित्य सिंधिया मध्यप्रदेश मधून महाराष्ट्रातून छत्रपती उदयनराजे भोसले व पियुष वेद प्रकाश गोयल तर राजस्थान मधून के .शी . वेणुगोपाल व त्रिपुरा मधून बीप लाब कुमार देव व तेलंगणा मधून डॉक्टर के. केशवराव, तर ओडिसा मधून ममता मोहत या राज्यसभेच्या १२ जागा रिक्त झाल्या आहेत महाराष्ट्रातील ज्या दोन जागा रिक्त झाले आहेत त्यातील छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या रिक्त झालेल्या जागेची मुदत२. ४.२०२६ पर्यंत आहे तर पियुष वगैरे यांच्या पित्त झालेल्या जागेची मुदत४. ०७.२०२८ पर्यंत आहे महाराष्ट्रातून या दोन जागांवर निवडून द्यायच्या दोन जागांसाठी भाजपामध्ये मोठी चढाव लागल्याचे पाहण्यास मिळत आहे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे लोकसभा निवडणुकीत उत्तर महाराष्ट्रातून पराभूत झालेल्या भारती पवार यांच्यासह अपक्ष खासदार नवनीत राणा तर मुंबईतून किरीट सोमय्या यांच्यासह शेतकरी कामगार पक्षातून भाजपामध्ये प्रवेश केलेले व दक्षिण रायगडचे भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशील मोहन पाटील यांची नावे चर्चिले जात आहेत

### अल्पसंख्याक संस्था संघटनांनी मानले...


अल्पसंख्याक समुदायासाठी 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत'च्या धर्तीवर 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णय विचाराधीन होता. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील सरकारमध्ये अल्पसंख्याक बांधवांची बाजू भक्कमपणे मांडण्याची तसेच त्यांच्यासाठी विकासयोजना तयार करण्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने पार पाडत आले आहेत. त्यांनी नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरिता कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याची घोषणाही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तत्पूर्वी, यावर्षी, ११ मार्च रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय तसेच जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता 'अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था' 'एमआरटीआय' स्थापन करण्याचा निर्णयही त्यांच्याच पुढाकाराने घेण्यात आला आहे. अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी एकूण ११ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संस्थेच्या आस्थापनेवरील पदांचे वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी, प्रशिक्षणासाठी एकूण ६ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली

### राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून...

त्यामुळे आम्ही महायुती सरकारचे काळे कारनामे घेऊन जनतेच्या दरबारात जाणार आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्याचे दर्शन घेऊन यात्रेची सुरुवात करणार अशी माहिती त्यांनी दिली. पहिल्या टप्प्यात दहा दिवसांत ही यात्रा महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांतून फिरणार असून लवकरच दुसऱ्या टप्प्याची घोषणा केली जाणार. तसेच ९ ऑगस्ट हा दिवस निवडण्याचा उद्देश म्हणजे महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली चले जाओ चळवळीचा नारा या दिवशी ऑगस्ट क्रांती मैदानातून देण्यात आला होता.

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याचे दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकिटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१



साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देवियां हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहण्यासाठी प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमलं, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# दुर्गाडी गणेश घाटावरील जाण्या-येण्याच्या रस्त्यासह इतर सुविधांचे नियोजन करा - शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील

## केडीएमसी, स्मार्ट सिटी,पोलीस अधिकाऱ्यांसह केली पाहणी

**कल्याण :** गणपती बाप्पा येण्यासाठी बरोबर एक महिना उरला असून त्यापूर्वीच कल्याणच्या दुर्गाडी गणेश घाटावर येण्या जाण्याच्या रस्त्यासह इतर आवश्यक सुविधांचे नियोजन करण्याची मागणी शिवसेना कल्याण शहरप्रमुख रवी पाटील यांनी केली आहे. रवी पाटील यांनी केडीएमसी शहर अभियंता, स्मार्ट सिटी विभाग, शहर पोलिसांसह वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांसमवेत गणेश घाट परिसराची पाहणी केली.




येत्या 7 सप्टेंबर रोजी गणेश उत्सवाला प्रारंभ होत असून त्याला बरोबर एक महिन्याचा कालावधी शिल्लक आहे. दुर्गाडी गणेश घाट परिसरात केवळ कल्याण पश्चिमेतीलच नव्हे तर उल्हासनगरमधूनही मोठ्या संख्येने भाविक गणेश विसर्जनासाठी येत असतात. परंतु दुर्गाडी गणेश घाट परिसरात सध्या स्मार्ट सिटी अंतर्गत नौदल संग्रहालयाचे काम सुरू आहे. त्यामुळे दुर्गाडी गणेश घाट परिसरात केवळ एकच मार्गिका उपलब्ध असून दुसऱ्या बाजूचा रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. ज्याचा मोठा परिणाम गणेश विसर्जनसाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या येण्या जाण्यावर होऊन गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

ही बाब शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांच्या निदर्शनास येताच त्यांनी शहर अभियंता अनिता परदेशी, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, स्मार्ट सिटीचे संदीप तांबे, अभियंता सोनवणे, खडकपाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केंचे, वाहतूक विभागाचे वरिष्ठ निरीक्षक शिरसाठ आदी प्रमूख अधिकाऱ्यांसमवेत या भागाची पाहणी केली. तसेच याठिकाणी पूर्वीप्रमाणेच येण्यासाठी आणि बाहेर पडण्यासाठी मार्गाची योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही रवी पाटील यांनी यावेळी केली. गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे भरण्यासाठीही आपण केडीएमसी प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहोत. पाऊस थांबल्यानंतर शहरातील हे रस्ते सुस्थितीत आणले जातील. आणि नविन रस्ते बनवण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

तर केडीएमसी शहर अभियंता अनिता परदेशी यांनी उपस्थित केडीएमसी अधिकाऱ्यांना याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यासह इतर आवश्यक सोयी सुविधाही उपलब्ध करून देण्याचे निर्देश यावेळी दिले आहेत. या भेटीवेळी माजी नगरसेवक अरविंद पोटे, विभागप्रमुख अनंता पगार, उपविभागप्रमुख अजय हिरवे, युवासेना कल्याण शहर प्रमुख पश्चिम सुजित रोकडे, उपशहरप्रमुख अनिरुद्ध पाटील, गटप्रमुख सुनील वाघ, युवासैनिक विनायक भोसले, सोहम बेनकर आदी उपस्थित होते.

# डोंबिवलीत पत्नीच्या छळाला कंटाळून पतीची आत्महत्या

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील भगवान काठेनगरमध्ये राहत असलेल्या पत्नीने आपल्या पतीचा मित्रांच्या मदतीन छळ करून, त्याला मानसिक, शारीरिकदृष्ट्या त्रास देऊन त्याला आत्महत्या करण्यास भाग पाडले असल्याचे विष्णुनगर पोलिसांनी केलेल्या तपासात उघडकीला आले आहे. गेल्या आठ महिन्यापूर्वी पतीने आत्महत्या केल्यानंतर दाखल गुन्ह्याप्रमाणे पोलिसांनी तपास सुरू केला होता.




सुधाकर यशवंत यादव (४२, रा. लिलाबाई म्हात्रे चाळ, भगवान काठे नगर, डोंबिवली) असे मयत पतीचे नाव आहे. संजना सुधाकर यादव (३१) आरोपी पत्नीचे नाव आहे. संजनाने महम्मद शेख, महेश पाटील आणि एक अनोळखी इसम यांच्या सहकार्याने आपल्या पत्नीचा मानसिक छळ केला. त्याला विविध प्रकारे त्रास देऊन त्याला जीवन जगणे आरोपींनी हैराण केले. पत्नीसह तिच्या मित्रांकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून आठ महिन्यापूर्वी सुधाकर यादव यांनी राहत्या घरात एकटा असताना घराच्या छताला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

सुधाकरचा बदलापूर येथे राहणारा भाऊ प्रभाकर यशवंत यादव यांनी भावाच्या आत्महत्येप्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात डिसेंबर २०२३ मध्ये तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने विष्णुनगर पोलिसांनी सखोल चौकशी केली. या चौकशीत सुधाकर याला त्याची पत्नी संजना आणि आरोपी मित्र हे खूप त्रास देत असल्याचे तपासातून पुढे आले. या त्रासाला कंटाळून सुधाकर यादवने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या तपासानंतर विष्णुनगर पोलिसांनी पत्नी संजनासह तिच्या आरोपी मित्रांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक जी. बी. देवरे यांनी याप्रकरणाचा तपास केला.

# घोडबंदर घाटात तेल सांडले, ठाणेकर कोंडीत अडकले



**ठाणे :** घोडबंदर घाटात बुधवारी पहाटे तेल सांडल्याने त्याचा परिणाम सकाळपासून जाणवू लागला आहे. भाईदर पाडा ते मानपाडा पर्यंत वाहनांच्या लांब रांगा लागल्या आहेत. वाहतूक कोंडीमुळे ठाणेकर हैराण झाले आहेत. घोडबंदरच्या कोंडीतून सुटका केव्हा मिळेल अशी विचारणा नागरिक करत आहेत.

ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या मार्गेवर तेल सांडले आहे. येथील वाहतूकीचा खोळंबा झाला असून भाईंदर पाडा ते मानपाडा पर्यंत वाहनाच्या रांगा लागल्या आहेत. वाहतूक कोंडीमुळे ठाण्याहून बोरिवली, वसई, भाईंदर, पालघरच्या दिशेने जाणाऱ्या वाहन चालकांचे हाल झाले आहेत. सकाळी ही वाहतूक कोंडी झाल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

अवघ्या दहा मिनिटांच्या अंतरासाठी वाहन चालकांना अर्धा तास लागत आहे. शाळेच्या बस गाड्या तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहने या कोंडीत अडकून आहेत. मागील काही दिवसांपासून ठाण्यामध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीवरून नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे या कोंडीतून सुटका केव्हा मिळेल अशी विचारणा नागरिक करत आहेत.

# ठाणे स्थानकातील सॅटिस लवकरच प्रवाशांच्या सेवेत!

**ठाणे :** ठाणे स्थानकाच्या पूर्वेकडील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिका प्रशासनाने मोठा गाजावाजा करत हाती घेतलेला 'स्थानक परिसर वाहतूक सुधारणा प्रकल्प' (सॅटिस) वेगवेगळ्या अडथळ्यांनंतर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. 'सॅटिस'साठीच्या वेगवेगळ्या परवानग्यांचा टप्पा जवळपास पूर्ण झाला आहे. त्यामुळे येत्या वर्षभरात 'सॅटिस'ची शिल्लक कामे मार्गी लावण्यात येतील.



मध्य रेल्वेवरील या महत्त्वाच्या स्थानकातून रोज साडेसात लाख प्रवासी ये-जा करतात. स्थानकाच्या पश्चिमेला सॅटिस पुलाची उभारणी करण्यात आली. त्याच धर्तीवर 'स्मार्ट सिटी' योजनेतून स्थानकाच्या पूर्वेला २६० कोटी रुपये खर्चाच्या सॅटिस पुलाची उभारणी करण्यात येत आहे.

या प्रकल्पाच्या कामाचा कार्यादेश पालिकेने २०१९ मध्ये ठेकेदार कंपनीला दिला. २०२२ मध्ये हा प्रकल्प पूर्ण होणार होता. परंतु ही मुदत उलटून गेल्यानंतर प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण होऊ शकलेले नाही. या प्रकल्पाचा आराखडा पालिका प्रशासनाने तयार केला होता. रेल्वेच्या जागेत होणाऱ्या कामांसाठी प्रशासनाची मंजुरी आवश्यक होती. यामुळे पालिकेने हा प्रस्ताव रेल्वे जमीन विकास प्राधिकरणाकडे पाठविला होता. मात्र, या विभागाने आराखड्यात सुचवलेल्या बदलानुसार पालिकेने सुधारित आराखडा तयार केला होता. त्यास प्राधिकरणाने मंजुरी दिली.

या जागेवरील रेल्वे विभागाची बांधकामे, शौचालये तसेच इतर अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत बराच कालावधी लागला. गेले काही महिने स्थानकाच्या पूर्वेला डेक उभारणीचे काम वेगाने सुरू असले तरी प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन हे काम दोन टप्प्यांत करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात डेकचे एका बाजूचे काम करून तो प्रवाशांसाठी खुला केला जाईल. डेकला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे कामही पूर्ण झाले आहे. रेल्वे रुळांवरील पूलजोडणीचे काम शिल्लक आहे. या कामालाही लवकरच सुरुवात होईल. आता वर्षभराची प्रतीक्षा करावी लागेल.

### प्रकल्प असा

- ☐ या प्रकल्पात तुळजा भवानी मंदिर, पूर्व द्रुतगती महामार्गावरील सेवा रस्ता ते कोपरी कन्हैया नगर, एमजेपी कार्यालयापर्यंत एकूण २.२४ किमी लांबीचा उन्नत मार्ग.
- ☐ यात १२ मीटर रुंद मार्गिका. स्थानकात वाहतूक व्यवस्थापनासाठी ९ हजार चौरस मीटर डेक उभारणी.
- ☐ डेक उन्नत मार्गाला जोडण्यात येणार असून त्यात 'स्टेशन बिल्डिंग'चाही समावेश असेल.
- ☐ डेकच्या तळघरात दुचाकी व चारचाकींसाठी वाहनतळ.
- ☐ पूर्तता आणि नियोजन
- ☐ कोपरी पुलाशेजारी रेल्वेरुळाच्या दोन्ही बाजूच्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण.
- ☐ पुलाच्या जोडणीसाठी सहा ओव्हरहेड वायर खांबांच्या जागांच्या बदलांना रेल्वे विभागाची मंजुरी.
- ☐ खांब स्थलांतरणाचे काम रेल्वे विभाग करणार असून त्यासाठी १ कोटी ९० लाख रुपये रेल्वे विभागाकडे जमा
- ☐ या कामासाठी रेल्वे विभाग निविदा काढेल. त्यानंतर ठेकेदार निश्चित केला जाणार असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.
- ☐ रेल्वेने मेगाब्लॉक जाहीर केल्यानंतर पूलजोडणीचे काम पालिका करेल.

# जिल्ह्यात मुरबाड तालुक्याची उत्तम कामगिरी

**ठाणे** - जिल्ह्यात मुरबाड तालुक्याने उत्तम कामगिरी केली असून 38 हजार 308 अर्जांपैकी मान्यताप्राप्त अर्ज संख्या 37 हजार 886 आहे. तर त्रुटीयुक्त 390 अर्ज असून रद्द करण्यात आलेल्या अर्जांची संख्या 22 आहे. यानुसार जिल्ह्यात सर्वाधिक मान्यताप्राप्त प्रकरणांची टक्केवारी मुरबाड तालुक्याची आहे. ही टक्केवारी 98.90 टक्के आहे.

**जिल्ह्यातील तालुकानिहाय नोंदी झालेली अर्ज संख्या आणि मान्यताप्राप्त अर्जांची टक्केवारी:-**

ठाणे तालुक्याने 1 लाख 87 हजार 900 अर्जांच्या नोंदी केल्या. त्यापैकी 1 लाख 87 हजार 900 अर्जांची तपासणी पूर्ण केली. यापैकी मान्यताप्राप्त अर्ज संख्या 1 लाख 62 हजार 22 आहे. तर त्रुटीयुक्त 25 हजार 229 अर्ज असून रद्द करण्यात आलेल्या अर्जांची संख्या 245 आहे. यानुसार ठाणे तालुक्यातील मान्यताप्राप्त प्रकरणांची टक्केवारी 86.23 टक्के आहे.

उल्हासनगर तालुक्याने 36 हजार 417 अर्जांच्या नोंदी केल्या. त्यापैकी 36 हजार 417 अर्जांची तपासणी पूर्ण केली. यापैकी मान्यताप्राप्त अर्ज संख्या 27 हजार 593 आहे. तर त्रुटीयुक्त 8 हजार 592 अर्ज असून रद्द करण्यात आलेल्या अर्जांची संख्या 10 आहे. यानुसार उल्हासनगर तालुक्यातील मान्यताप्राप्त प्रकरणांची टक्केवारी 75.77 टक्के आहे.

कल्याण तालुक्याने 1 लाख 6 हजार 657 अर्जांच्या नोंदी केल्या. त्यापैकी 1 लाख 6 हजार 657 अर्जांची तपासणी पूर्ण केली. यापैकी मान्यताप्राप्त अर्ज संख्या 90 हजार 893 आहे. तर त्रुटीयुक्त 15 हजार 590 अर्ज असून रद्द करण्यात आलेल्या अर्जांची संख्या 156 आहे. यानुसार कल्याण तालुक्यातील मान्यताप्राप्त प्रकरणांची टक्केवारी 85.22 टक्के आहे.

भिवंडी तालुक्याने 82 हजार 319 अर्जांच्या नोंदी केल्या. त्यापैकी 82 हजार 319 अर्जांची तपासणी पूर्ण केली. यापैकी मान्यताप्राप्त अर्ज संख्या 72 हजार 754 आहे. तर त्रुटीयुक्त 9 हजार 341 अर्ज असून रद्द करण्यात आलेल्या अर्जांची संख्या 218 आहे. यानुसार भिवंडी तालुक्यातील मान्यताप्राप्त प्रकरणांची टक्केवारी 83.38 टक्के आहे. अंबरनाथ तालुक्याने 50 हजार 866 अर्जांच्या नोंदी केल्या.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी महापालिकेने उपलब्ध केली नि:शुल्क शाडूची माती

## ०६ मूर्तीकारांनी घेतला योजनेचा लाभ, ०४ मूर्तीकारांना दिली मूर्ती घडविण्यासाठी नि:शुल्क जागा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या आयोजनासाठी ठाणे महापालिकेचे विविध उपक्रम

**ठाणे :** पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आयोजन व्हावे यासाठी ठाणे महापालिकेतर्फे मार्च महिन्यापासून विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. याच अंतर्गत महापालिकेने यंदा ठाणे महापालिका क्षेत्रातील ०६ मूर्तीकारांना नि:शुल्क शाडूची माती, तसेच, ०४ मूर्तीकारांना मूर्ती घडविण्यासाठी नि:शुल्क जागा उपलब्ध करून दिली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील गणेशोत्सव पर्यावरणपूरक व्हावा यासाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, मूर्तीकार संघटना, स्वयंसेवी संस्थाची मदत घ्यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. या सगळयांच्या सहकार्याने हा उत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्याकडे आपण



मार्गक्रमण करू शकतो, अशी भूमिका आयुक्त राव यांनी मांडली आहे. त्यानुसार, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या सूचनांनुसार ठाणे महापालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सव नियमावली- २०२४ मार्च महिन्यात प्रकाशित करण्यात आली. तसेच, विविध घटकांशी संवाद साधण्यासाठी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या स्तरावर बैठकांचेही आयोजन करण्यात आले होते.

याच उपक्रमात, पालिकेच्या पर्यावरण विभागाने शाडूची नि:शुल्क माती तसेच मूर्ती घडविण्यासाठी नि:शुल्क जागा उपलब्ध करून दिली होती. शाडूच्या नि:शुल्क मातीसाठीच्या आवाहनाला सहा मूर्तीकारांनी मागणी नोंदवून प्रतिसाद दिला. तर, शाडूच्या मातीच्या मूर्ती घडविण्यासाठी चार मूर्तीकारांनी नि:शुल्क जागेची मागणी केली होती. त्यानुसार, महापालिकेने वर्तक नगर प्रभाग समिती क्षेत्रात ०३ आणि माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रात ०१ जागा दिली. इतर प्रभाग समिती क्षेत्रातून तशी मागणी झाली नाही, अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली.

दरम्यान, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या आयोजनाबाबत जनजागृती करण्यासाठी ठाणे महापालिकेने प्रथमच मूर्तीकार संघासोबत विष्णूनगरमधील महापालिकेच्या शाळा क्र.१९ येथे पर्यावरण स्नेही मूर्ती, मखर आदी साहित्यांचे प्रदर्शन भरविले. तेथे पुठ्ठा, कागद, कोकोपीठ, शाडू, लालमाती यांच्यापासून तयार करण्यात आलेल्या मूर्ती, कागदाचे मखर इत्यादी साहित्य ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनासोबतच, नागरीकांसाठी शाडू मातीपासून गणपती तयार करण्याची कार्यशाळा पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या समन्वयाने करण्यात आली. ठाणेकरांनी त्यास चांगला प्रतिसाद दिला. या प्रदर्शन साहित्याविषयीची अधिक माहिती आणि संपर्क ठाणे महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे मनीषा प्रधान यांनी सांगितले. त्याच बरोबर, पर्यावरणपूरक उत्सवांच्या आयोजनात लहान मुलांचा सहभाग वाढविण्यासाठी शाडू मातीपासून मूर्ती तयार करण्याच्या कार्यशाळांचे शाळांमध्येही आयोजन केले.

# "मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण" योजनेंतर्गत जिल्ह्यात 5 लाख 47 हजार 870 अर्जांच्या नोंदी पूर्ण

**ठाणे** (जिमाका) - "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" ही योजना राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून ठाणे जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी, या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये कोणतीही प्रशासकीय क्लिष्टता न आणता सुलभता आणावी, अशा प्रकारच्या सूचना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण राज्याला दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त भगिनींचा या योजनेमध्ये सहभाग नोंदवून ठाणे जिल्हा राज्यात अव्वल राहील, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी काही दिवसांपूर्वी जिल्हा प्रशासनाला केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी अत्यंत कठोर परिश्रम घेत "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेची यशस्वी अंमलबजावणी करीत असल्याचे दिसून येत आहे.

"मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण" योजनेंतर्गत दि. 6 ऑगस्ट 2024 रोजी पर्यंत जिल्ह्यात 5 लाख 47 हजार 870 अर्जांच्या नोंदी झाल्या असून 100% अर्जांची तपासणी पूर्ण झाली आहे. यापैकी मान्यताप्राप्त अर्जांची संख्या 4 लाख 76 हजार 258 इतकी असल्याची माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली आहे.

# बेशिस्त रिक्षा चालकांना बसणार चाप

## भाजपाचे ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघूले यांनी टीएमटी बसच्या फेऱ्या वाढवण्यासाठी राबवली स्वाक्षरी मोहीम, प्रवाशांचा उत्स्फुर्त प्रतिसाद..

**ठाणे** -: ठाण्यातील वागळे इस्टेट येथील आयटी कर्मचाऱ्यांचा कामावर जाण्याचा प्रवास सुसह्य व्हावा, यासाठी भाजपाचे ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघूले यांनी पुढाकार घेतला आहे. टी.एम.टी बसच्या सेवेत वाढ करावी आणि बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई करावी यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीकेबीन परिसरात बुधवारी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला प्रवाशांचा उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळाला.

गेल्या दोन दिवसांपुर्वी वाढीव दंडाविरोधात रिक्षा चालकांनी संप पुकारला होता. यावेळी प्रवाशांचे प्रचंड हाल झाले तसेच शेअर रिक्षाचालकांचा




बेशीस्तपणा सुरु असतो. तीन प्रवाशांपेक्षा जास्त प्रवासी रिक्षामध्ये बसवून प्रवास केला जातो. त्यामुळे प्रवाश्यांचा प्रवास असुरक्षित असल्याचे देखील वाघूले यांनी सांगीतले. त्यामुळे जास्तीत जास्त टी.एम.टी च्या बसेस सोडण्यात याव्यात यासाठी स्वाक्षरी मोहिम पार पडली.

वाघूले यांच्या प्रयत्नाने १ ऑगस्टपासून टी.एम.टी च्या जादा बसेस बीकेबीन येथून सकाळी सुटत आहेत. तर काही बेशिस्त रिक्षाचालकांनी अचानक संप करित आडमुठी भुमिका घेत प्रवाशांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. परंतु टी.एम. टीच्या सोमवारी अवघ्या अडीच तासात ३५ ते ४० जादा फेऱ्यांमुळे आयटी कर्मचाऱ्यांना कामात पोहचता आले. तसेच टी.एम.टी चा नफा देखील मोठ्या प्रमाणात झाला.

मात्र बेशिस्त रिक्षाचालकांच्या बाजूने बोलणाऱ्या वागळे इस्टेटमधील काही नेते व पदाधिकाऱ्यांनाही संजय वाघूले यांनी खडसावले. त्याचबरोबर सात शेअर रिक्षासाठीच्या स्टॅंडमुळे सुमारे २०० रिक्षा उभ्या राहत असल्यामुळे सातत्याने वाहतुक कोंडी होत असल्याच्या पार्श्वभुमीवर हा थांबा रद्द करावा.

गोखले रस्त्यावरील स्वानंद सोसायटी ते मॅकडोनाल्ड विरुध्द दिशेने जाणारे व ओव्हरसीट यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी वाहतुक पोलीस व आरटीओ प्रशासनाकडे केली आहे. अशी माहिती संजय वाघूले यांनी दिली आहे.

## 'नवरा माझा नवसाचा' चित्रपटाचे चाहते असाल तर हे क्विझ खास तुमच्यासाठीच...; द्या




सचिन पिळगांवकरांचा 'नवरा माझा नवसाचा' हा एव्हरग्रीन चित्रपट २००४ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटामध्ये नायकाच्या वडिलांनी बाप्पाकडे नवस केलेला असतो. हा नवस फेडताना नायकाची कशी तारांबळ उडते अन् त्यानंतर गणपती बाप्पा त्याच्याकडून कसा नवस फेडून घेतो, यादरम्यान होणारी खलनायकाची एन्ट्री या सगळया गोष्टी रंजक पद्धतीने पाहायला मिळतात. चित्रपटात अनेक दिग्गज कलाकारांची मांदियाळी असून काही कलाकारांचे कॅमिओ देखील आहेत.

'नवरा माझा नवसाचा' चित्रपटासंदर्भातील क्विझ

आज २० वर्षांनंतरही 'नवरा माझा नवसाचा' या चित्रपटाबद्दलच्या सगळया गोष्टी आपल्या लक्षात आहेत. या चित्रपटाचे तुम्ही देखील दर्दी चाहते असाल तर क्विझ खास तुमच्यासाठी आहे. 'नवरा माझा नवसाचा' या चित्रपटासंदर्भात या क्विझमध्ये एकूण दहा प्रश्न आहे. या १० प्रश्नांची अचूक उत्तरं द्या. तसेच तुम्हाला आवडल्यास तुमच्या इतर सहकाऱ्यांनाही पाठवा!

# रोहित-कोहलीची गरज होती का?

## ■ गौतम गंभीरच्या रणनीतीवर आशिष नेहराने उपस्थित केले प्रश्न

मला माहित आहे की गौतम गंभीर हा प्रशिक्षक म्हणून नवीन आहे, त्याला अनुभवी खेळाडूंसोबत थोडा वेळ घालवायचा आहे. पण या मालिकेसाठी विराट कोहली आणि रोहित शर्माला विश्रांती द्यायला हवी होती, असे मला वाटते. या दोन खेळाडूंच्या जागी अन्य खेळाडूंवर प्रयत्न करता आले असते. आशिष नेहरा पुढे म्हणतो की, गौतम गंभीर हा परदेशी प्रशिक्षक नाही, ज्याला रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासोबत परिपूर्ण समन्वय निर्माण करायचा आहे. या दोन ज्येष्ठ खेळाडूंच्या जागी युवा खेळाडूंना संधी मिळायला हवी होती.

खरंतर या मालिकेत रोहित शर्माने चांगली कामगिरी केली असली तरी विराट कोहली मात्र संघर्ष करताना दिसत आहे. या मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्माने ४७ चेंडूत ५८ धावांची चांगली खेळी खेळली, मात्र विराट कोहलीने ३२ चेंडूत २४ धावा केल्यानंतरही



**श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या वनडेत भारताला ३२ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर टीम इंडियाच्या रणनीतीवर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. आता भारताचा माजी वेगवान गोलंदाज आशिष नेहराने मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर तोंडसुख घेतले आहे. भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांची रणनीती योग्य नसल्याचं आशिष नेहराने म्हटलं आहे. या मालिकेसाठी विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्याऐवजी दुसऱ्या खेळाडूंना खेळवायला हवे होते, असं मत आशिष नेहराने व्यक्त केलं आहे.**

तो कायम राहिला. यानंतर दुसऱ्या वनडेमध्ये रोहित शर्माने ४४ चेंडूत ६४ धावा केल्या, मात्र विराट कोहली १९ चेंडूत १४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये गेला. या मालिकेतील पहिला वनडे सामना बरोबरीत सुटला होता. पण दुसऱ्या वनडेत श्रीलंकेने टीम इंडियाचा ३२ धावांनी पराभव केला.

पराभवानंतर रोहित शर्मा काय म्हणाला?

रोहित शर्मा या पराभवाबाबत बोलताना म्हणाला की जेव्हा तुम्ही मॅचमध्ये पराभूत होता तेव्हा तुम्हाला प्रत्येक गोष्ट दु:खी करत असते. फक्त १० ओव्हरची गोष्ट नसते, जेव्हा तुम्हाला मॅच जिंकायची असते तेव्हा सातत्य राखायला लागतं.आम्ही सातत्य राखण्यात अपयशी ठरलो, थोडा निराश झालो आहे, मात्र असं होतं असतं, तुमच्या समोर जे आहे ते बदलायचं असतं. आम्हाला वाटलं डाव्या उजव्या फलंदाजाची जोडी फायदेशीर ठरेल. मात्र वेंडरसेनं चांगली कामगिरी केली, त्यानं सहा विकेट घेतल्या, असं रोहित म्हणाला. आक्रमक फलंदाजी केल्यामुळं ६४ धावा केल्या, मी माझं धोरण बदलणार नसल्याचं देखील तो म्हणाला. आम्हाला या खेळपट्टीची माहिती आहे, मधल्या षटकात खेळणं अवघड होऊन जातं. त्यामुळं पॉवरप्लेमध्ये अधिक धावा करण्याचा प्रयत्न केला, असं रोहित शर्मानं सांगितले. श्रीलंकेनं पहिल्या सामन्यात भारताला विजयापासून रोखत मॅच ड्रॉ राखण्यात यश मिळवलं. दुसऱ्या सामन्यात भारताला पराभवाचा धक्का देत श्रीलंकेनं मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

यामुळं भारताला मालिकेत बरोबरी करणं गरजेचं झालेलं आहे. भारताला काहीही करुन तिसऱ्या सामन्यात विजय मिळवणं आवश्यक आहे. 7 ऑगस्ट रोजी तिसरा सामना खेळवण्यात येणार आहे.

## संक्षिप्त घडामोडी



### भारताची निशा दहिया हात तुटल्यानंतरही लढली; हरल्यानंतर ढसाढसा रडली

भारताची महिला मल्ल निशा दहिया हिला दुखापतीमुळे ऑलिम्पिक पदकास मुकावे लागले. शानदार विजयासह उपांत्यपूर्व फेरी गाठल्यानंतर मोक्याच्यावेळी हात दुखावल्याने निशाला उत्तर कोरियाच्या पाक सोल गमविरुद्ध ८-२ अशा भक्कम आघाडीनंतर पराभव पत्करावा लागला. ६८ किलो वजनी फ्रीस्टाईल गटात निशाने आधी यूक्रेनच्या तेतिआना सोवा रिझको हिचा ६-४ असा पराभव केला.

## ऐश्वर्या नारकर वाहतूक कोंडीमुळे त्रस्त!




पावसाळा सुरू झाल्यापासून मराठी कलाविश्वातील बऱ्याच कलाकारांना मुंबई – ठाण्यातून प्रवास करताना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वीच अभिनेता शशांक केतकर जवळपास तासभर ट्राफिकमध्ये अडकला होता. यासंदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत अभिनेत्याने याबाबत संताप व्यक्त करत मुंबई, ठाणे महानगरपालिका आणि मुंबई पोलिसांना टॅग केलं होतं. आता असाच काहीसा अनुभव अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांना आला आहे.

ऐश्वर्या नारकर शूटिंग निमित्त दररोज घोडबंदर रोडने प्रवास करतात. अनेकदा रस्त्यावर ट्राफिक असल्याच्या पोस्ट त्या शेअर करत असतात. आज अभिनेत्रीने व्हिडीओ शेअर करत यामध्ये घोडबंदरच्या वाहतूक कोंडीवर काहीतरी उपाय काढला पाहिजे असं म्हटलं आहे. "काय करायचं या घोडबंदरच्या ट्राफिकचं? आता तर मी याच्या प्रेमात पडायला लागले आहे" असं ऐश्वर्या नारकर त्यांच्या पहिल्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये म्हणाल्या आहेत.

ऐश्वर्या नारकर वाहतूक कोंडीबद्दल काय म्हणाल्या?

अभिनेत्री त्यांच्या पुढच्या स्टोरीमध्ये व्हिडीओ शेअर करत म्हणतात, "रस्ता न होण्यामागे आणि वाहतूक कोंडी असण्यामागे प्रत्येकाची बाजू असेल...सरकारची बाजू असेल, राजकारण्यांची बाजू असेल याशिवाय ज्यांना या रस्त्यांचं कंत्राट मिळतं त्यांची बाजू असेल. या रस्त्यासाठी काम करणाऱ्या कामगारांचं वेगळं मत असेल... पाऊस, वातावरण सगळ्याच गोष्टी आपण मान्य केल्या तरी... आता

## तुम्हीही रात्री डोक्याखाली जाड उशी घेऊन झोपता का?



झोपताना जास्तीत जास्त लोक डोक्याखाली उशी घेतात. काही लोकांना उशीशिवाय झोपच येत नाही. पण, असं करणं आरोग्यासाठी किती नुकसानकारक असतं हे अनेकांना माहीत नसतं. प्रत्येकाच्या झोपण्याच्या सवयी वेगळया असतात. काहींना शरीर सरळ रेषेत ठेवून झोपायची सवय असते, तर काही जण आडवे-तिडवे झोपतात, काहींना उशी लागते, तर काही विनाउशीचे झोपतात.

## दिनविशेष

**घटना**

२००८: ऑलिम्पिक - २९व्या उन्हाळी ऑलिम्पिक खेळ बीजिंग, चीन येथे सुरु झाले.
२०००: वेदमूर्ती मोरेश्वर घैसास यांना महाराष्ट्र राज्याचा महाकवी कालिदास संस्कृत-साधना पुरस्कार जाहीर.
१९९८: संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (DRDO) - प्रयोगशाळा औद्योगिक क्षेत्रासाठी खुल्या झाल्या.
१९९४ : डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमन, पुणे (Dr. Bhanuben Nanavati College of Architecture for Women) सुरू झाले.
१९९१ : वॉर्सा रेडिओ मास्ट एका वेळी बांधलेले सर्वात उंच बांधकाम कोसळले.
१९९०: आखाती युद्ध (Gulf War) - इराकने कुवेतवर कब्जा केला. यामुळे लवकरच आखाती युद्ध सुरु होणार होते.

**जन्म**

१९८९: प्राजक्ता माली भारतीय मराठी अभिनेत्री
१९८८: रिंकू सिंग राजपूत - भारतीय व्यावसायिक कुस्तीपटू आणि माजी व्यावसायिक बेसबॉल खेळाडू
१९८१: रॉजर फेडरर - स्विस लॉन टेनिस खेळाडू
१९६८ : ऍबे कुरिविला - भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक
१९५२: सुधाकर राव भारतीय क्रिकेटपटू
१९५० : केन कुटारगी प्ले-स्टेशनचे निर्माते
१९४०: दिलीप सरदेसाई - भारतीय क्रिकेटपटू (निधन: २ जुलै २००७)
१९३४ : शरत पुजारी - भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक (निधन : १२ मे २०१४ )
१९३२ : दादा कोंडके अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शक ( निधन : १४ मार्च १९९८)

**निधन**

२०२२: उमा पेम्माराजू - भारतीय-अमेरिकन पत्रकार आणि न्यूज अँकर (जन्म: ३१ मार्च १९५८)
२००५: जॉन एच. जॉन्सन जॉन्सन पब्लिशिंग कंपनीचे संस्थापक (जन्म: १९ जानेवारी १९१८)
१९९९: गजानन नरहर सरपोतदार चित्रपट निर्माते व दिग्दर्शक
१९९८ : सुमती क्षेत्रमाडे लेखिका व कादंबरीकार
१९८० : पॉल ट्रिकेट कॅनेडियन जनरल व्हिक्टोरिया क्रॉस (जन्म: २ एप्रिल १९१०)
१९४८ : क्लॉड ॲश्टन जोन्स अमेरिकन ॲडमिरल - मेडल ऑफ ऑनर विजेते (जन्म: ७ ऑक्टोबर १८८५)

## 'चक दे इंडिया'मधील ऑस्ट्रेलियन टीमचा कोच ठरला हॉकी इंडियासाठी व्हिलन

काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'चक दे इंडिया' या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली होती. बॉक्स ऑफिसवरही चित्रपटाने कमाल केली होती. या चित्रपटात शाहरुख खान आणि इतर कलाकारांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात लक्षात आहेत. या चित्रपटात ऑस्ट्रेलियन टीमच्या कोचची भूमिकाही भारतीय प्रेक्षक विसरले नाहीत. भारतीय संघाला पराभूत करण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेऊन ऐनवेळी रणनीतीमध्ये बदल करणारा ऑस्ट्रेलियन कोच प्रेक्षकांच्या लक्षात राहिला. रुपेरी पडद्यावरील हा कलाकार पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघासाठी व्हिलन ठरला आहे.

पॅरिस ऑलिम्पिमकमध्ये भारताच्या हॉकी संघाने जबरदस्त कामगिरी करत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. 'चक दे इंडिया' या चित्रपटात ऑस्ट्रेलियन संघाच्या कोचची भूमिका जोशुआ हर्ट यांनी साकारली आहे. याच जोशुआ हर्ट यांचा सध्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे.

## बांगलादेशात हिंसाचाराचा उद्रेक !

## माजी कर्णधाराचे घर पेटवले



पंतप्रधान शेख हसीना यांचा राजीनामा आणि देश सोडून पलायन केल्यानंतर बांगलादेशमधील हिंसाचाराने उग्ररुप धारण केले आहे. पंतप्रधानांच्या निवासस्थानापासून ते रस्त्यांवर सर्वत्र आंदोलकांनी ताबा घेतला असून जाळपोळ, तोडफोड सुरूच आहे. बांगलादेशमधील क्रिकेटपटूंनाही या आंदोलनाची झळ बसली असून अनेक आजी- माजी खेळाडूंची घरे जाळण्यात आली आहेत.

पंतप्रधान शेख हसीना यांनी देश सोडल्यानंतर बांगलादेशमध्ये अराजकता माजली आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने आणखी उग्ररुप धारण केले आहे.

■ धक्कादायक बाब म्हणजे आंदोलकांनी क्रिकेटपटूंच्या घरांनाही लक्ष केले असून बांगलादेशमधील माजी क्रिकेटपटू मशरफी मोर्तझा आणि यष्टिरक्षक फलंदाज लिटन दास यांच्या घरांवर हल्ला करत त्यांचे आलिशान बंगले पेटवून दिले. मशरफी मुर्तझा हे बांगलादेशातील नराइल-2 मतदारसंघाचे खासदार आहेत, जे माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या जवळचे मानले जातात. मुर्तझा हे वर्षी सलग दुसऱ्यांदा नरेल-२ मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले. आंदोलकांनी मुर्तझा यांच्या घराला आग लावून दिली तसेच घराची तोडफोड करत लुटमार केल्याचे समोर आले आहे.

## राशि भविष्य

**मेष** – तुमच्या भावना खासकरून रागावर नियंत्रण ठेवा. व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. आजच्या दिवशी तुम्ही आपल्या व्यवसायाला नवीन उच्चता देऊ शकतात. घरातील संवेदनशील प्रश्न सोडविण्यासाठी तुम्हला आज तुमची बुद्धिमत्ता आणि प्रभाव दाखवावा लागेल.

**वृषभ** – आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणि परिवर्तनशीलता, लवचिकता वाढेल, पण त्याच वेळी भीतीपोटी, चिंतेमुळे निर्माण होणाऱ्या द्वेषमूलक वैरभावाचा त्याग करा. जे लोक शेअर बाजारात पैसा लावतात आज त्यांना नुकसान होऊ शकते.

**मिथुन** – तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. दुस-यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. एखाद्या जुन्या मित्राच्या फोन मुळे सायंकाळ स्मरणरंजनात व्यतीत होईल. आजच्या दिवशी डेटवर जाणार असाल तर विवादात्मक विषय काढणे टाळा.

**कर्क** – मोतीबिंदू असणा-या रुग्णांनी प्रदुषित वातावरणात जाणे टाळावे. धुरामुळे आपल्या डोळयांना आणखी त्रास होऊ शकतो. प्रखर सूर्यप्रकाशात जाणे शक्यतो टाळावे. तसे तर आपला पैसा दुसऱ्यांना देणे कुणाला आवडत नाही परंतु, आज तुम्ही कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल.

**सिंह** – तुमचा आजार तुमच्या दु:खाचे कारण ठरेल. लवकरात लवकर त्यावर मात करून कुटुंबात आनंद परत आणा. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा आणि ऑफिस मध्ये सर्वांसोबत चांगल्या प्रकारे व्यवहार करा जर तुम्ही असे केले नाही तर, तुमची नोकरी जाऊ शकते आणि तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

**कन्या** – हृदयरोग असणाऱ्यांनी कॉफी सोडण्याची तातडीची गरज आहे. यापुढेही असेच कॉफी घेत राहिलात तर आपल्या हृदयावर अनावश्यक दडपण येईल. मागच्या दिवसात तुम्ही जितके धन आजचा काळ उत्तम बनवण्यासाठी गुंतवणूक केली होती त्याचा फायदा आज तुम्हाला मिळू शकतो. कौटुंबिक बंधन, कर्तव्य विसरू नका.

**तूळ** – वाद, संघर्ष टाळा, अन्यथा तुमच्या आजारात भर पडेल. धनाची देवाण-घेवाण आज दिवसभर असेल आणि दिवस मावळण्याची वेळी तुम्ही बचत करण्यात यशस्वी असाल. तुम्हाला निवांत आरामाची गरज आहे आणि जवळचे मित्र व कुटुंबातील सदस्यांमध्ये राहून आनंदाचा काळ घालवा.

**वृश्चिक** – तुम्ही आज ऊर्जेने भारलेले आहात आणि तुम्हाला आज काहीतरी निराळे, अतिरिक्त असे काही करावेसे वाटेल व तुम्ही ते कराल. आपल्या अपेक्षेप्रमाणे पैसे मिळणार नाही. आजच्या दिवशी कामाचा ताण कमी असेल, त्यामुळे तुम्ही कुटुंबासोबत चांगला वेळ घालवू शकाल. तुमची प्रिय व्यक्ती वचन मागणार आहे.

**धनु** – शारीरक वेदना आणि ताणतणावाचे प्रश्न सुटण्याची शक्यता नाही. आज तुम्ही त्या लोकांना उधार देऊ नका ज्यांनी तुमची मागील उधारी चुकवलेली नाही. आपल्या बहिणीचा विवाह ठरण्याच्या बातमीमुळे आपण आनंदीत व्हाल. पण ती आपल्यापासून दूर होणार या भावनेने काहीसे दु:खी देखील व्हाल.

**मकर** – वाहन चालविताना काळजी घ्या. ज्या लोकांनी आपला पैसा सट्टेबाजी मध्ये लावलेला आहे आज त्यांना नुकसान होण्याची शक्यता आहे. सट्टेबाजी पासून दूर राहण्याचा तुम्हाला सल्ला दिला जातो. शाळेचा प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी मुलांना तुमच्या मदतीची गरज भासेल. प्रेमाच्या परमानंदात आज तुमची स्वप्ने आणि वास्तव एकच होतील.

**कुंभ** – तुम्ही सकारात्मक दृष्टिकोन आणि विश्वास यामुळे तुमच्या अवतीभवतीच्या लोकांवर प्रभाव पाडण्याची शक्यता आहे. ज्या लोकांनी नातेवाइकांकडून पैसा उधार घेतला होता त्यांना ते उधार कुठल्या ही परिस्थितीमध्ये परत करावी लागू शकते.

**मीन** – विश्रांती घ्या आणि कामात व्यग्र असताना मधेमधे थोडा आराम करा. दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. तुम्हाला वाटले त्यापेक्षा तुमचा भाऊ तुम्हाला तुमच्या गरजेच्या वेळी उत्तम पाठिंबा देऊ करेल. घरगुती पातळीवर काही अडचणी निर्माण होतील, पण आपल्या जोडीदारास छोट्या छोट्या गोष्टींवरुन टोकणे टाळावे.

# पाऊस कविता आणि गाण्यात रंगलेली एक संध्याकाळ




**कल्याण:** अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंड यांचे संयुक्त विद्यमाने ' आया सावन झुमके ' या पावसाळी कविता आणि गीते ही शब्द सुरांची मैफल कल्याणातील अचिव्हर्स कॉलेज सभागृहात पार पडली. तुडुंब भरलेल्या या सभागृहात विविध आशयाच्या व स्वरूपाच्या पावसाळी कविता आणि पाऊस विषयक हिंदी मराठी चित्रपट गीतांनी रसिकांची मने ओलीचिंब केली. पावसाने सुद्धा हजेरी लाऊन कार्यक्रमात रंग भरला. अक्षरमंच अध्यक्ष डॉ योगेश जोशी व रोटरी क्लब प्रेसिडेंट रो. अरविंद शिंदे यांचे संकल्पनेतून सादर झालेल्या या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख रो. संजय पैठणकर होते . चाळीसहून अधिक कवी आणि गायक यांनी साकारलेल्या या शब्द सूर मैफल कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ योगेश जोशी व कल्याणी नेवे यांनी बहारदारपणे केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.महेश भिवंडीकर यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली . विजय जोशी ( पाऊस ) , जयंत भावे ( ऋतू पावसाळा ओला) , रमेश तारमळे( वर आभाळ) , प्रा प्रकाश माळी ( पहिला पाऊस) ,सुकन्या जोशी ( तो मी आणि पाऊस) , उज्वला लुकतुके ( सरींच्या घड्या) , मुग्धा घाटे (आषाढ ) ,आरती मुळे( श्रावण) , जया पाटील (घन बरसले सुखाचे) ,मंगेश घाटे ( पाऊस आलाय) ,वृंदा दुर्वे ( श्रावण आला) , सुनील म्हसकर ( श्रावणधारा) , विजयकुमार देसले ( पावसाच्या धारा) ,अर्जुन बांबेरे ( मुक्तीच्या सरी) , लीलाधर महाजन ( पहिला पाऊस) या कविता सादर करण्यात आल्या.संजय पैठणकर ( बरसात के मोसम में) , डॉ.जितेंद्र बोबडे( लगी आज सावन की फिर वो झडी ) , डॉ. संदीप वनसूत्रे ( भिगी भिगी रातों में) , रोहिणी क्षीरसागर ( रिम झिम झरती श्रावण धारा) ,रो. विजय वैद्य ( ओ सजना बरखा बहार) , पुरुषोत्तम जावडेकर ( जिंदगी भर नहीं भुलेंगे) , नागेश म्हेत्रे व दिपाली वैद्य ( टीप टीप बरसा पानी) , आनंद कामत( मेरे नयना सावन भादो) , राजेंद्र वाघमारे (आखिर तुम्हे आना हैं ) , रो.हिरामण क्षीरसागर ( आज मोसम बडा बेईमान हैं ) , डॉ वैशाली घोणे ( रिमझिम गिरे सावन ) , लीना घोसाळकर व शेखर विश्वेश्वर ( आया सावन झूम के) रो. डॉ दिनेश गुप्ता ( बादल बिजली चंदन पानी),प्रदीप पातकर (सावन का महिना पवन करे) यांनी विविध गाणी सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

# नालासोपारा शस्त्रसाठा प्रकरण

## उजव्या विचारसरणीच्या पाच आरोपींना उच्च न्यायालयाकडून जामीन



**नालासोपारा :** नालासोपारा येथील २०१८ सालच्या शस्त्रसाठा प्रकरणासह पुण्यातील सनबर्न महोत्सवावर हल्ला करण्याचा कट रचल्याच्या आरोपाप्रकरणी राज्य दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) अटक केलेल्या सनातन संस्था आणि हिंदू जनजागृती समितीच्या कथित पाच सदस्यांना उच्च न्यायालयाने नुकताच जामीन मंजूर केला. सुजित रंगास्वामी, अमित बद्दी, गणेश मिस्कीन, श्रीकांत पांगारकर आणि भरत कुरणे या पाचजणांना २०१८ मध्ये अटक करण्यात आली होती.

याचिकाकर्त्यांचा कटात सहभाग असल्याचे कोणतेही पुरावे सादर करण्यास तपास यंत्रणेला सकृतदर्शनी अपयश आले आहे. तसेच, खटला लवकरात लवकर निकाली निघण्याची शक्यता नाही. याशिवाय, आरोपी गेल्या सहा वर्षांपासून तुरुंगात असल्यामुळे ते जामीनास पात्र आहेत, असे निरीक्षण न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने नोंदवले. तसेच, पाचही आरोपींना जामीन मंजूर केला. शरद कळसकर आणि वैभव राऊत या दोन आरोपींच्या चौकशीनंतर एटीएसने त्यांच्या नालासोपारा येथील निवासस्थानी छापा टाकला होता व तेथून शस्त्रे, दारूगोळा आणि स्फोटके हस्तगत केली होती. त्या दोघांच्या कबुलीजबाबाच्या आधारे, या प्रकरणात आणखी १० जणांना अटक करण्यात आली होती. त्यात, उपरोक्त पाच आरोपींचा समावेश होता. विशेष न्यायालयाने जामीन नाकारल्यानंतर त्या आदेशाला पाचही जणांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

सनबर्न महोत्सव कोणत्याही अनुचित घटनेविना पार पडला होता. परंतु, याचिकार्त्यांना या प्रकरणात ऑगस्ट २०१८च्या पहिल्या आठवड्यात म्हणजे कार्यक्रम संपल्यानंतर आठ महिन्यांनी अटक करण्यात आल्याचे न्यायालयाने आदेशात नमूद केले. याचिकाकर्ते कार्यक्रम उधळून लावण्याच्या कटात सहभागी असल्याचा कोणताही ठोस पुरावा सादर करण्यास तपास यंत्रणा अपयशी ठरली. तसेच, खटला जलदगतीने निकाली निघणे हा आरोपीचा मूलभूत अधिकार आहे. परंतु, कनिष्ठ न्यायालयातील खटला वेळेवर पूर्ण होण्याची शक्यता धूसर आहे. ही बाब लक्षात घेता आरोपी जामिनास पात्र असून त्यांना जामीन मंजूर करत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

# इमारतीवरून कुत्रा अंगावर पडला, ३ वर्षीय मुलीचा मृत्यू



**ठाणे** - इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडलेला कुत्रा ३ वर्षांच्या मुलीच्या अंगावर पडला. या घटनेमध्ये चिमुकलीचा मृत्यू झाला. मुंब्रामध्ये ही धक्कदायक घटना घडली आहे. ही थरकाप उडवणारी घटना सीसीटीव्हीत (CCTV) कैद झाली असून त्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलिसांकडून तपास सुरू आहे. या घटनेमुळे मुंब्रामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील अमृत नगर येथे ही घटना घडली. चिराग मेसन नावाच्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर राहणाऱ्या जैद सय्यद यांनी कुत्रा पाळला होता. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास जैद यांचा कुत्रा पाचव्या मजल्यावरून खाली पडला. यावेळी रस्त्यावरून आपल्या आईसोबत जाणाऱ्या ३ वर्षीय चिमुकलीच्या अंगावर हा कुत्रा पडला. कुत्रा पडल्यानंतर मुलीच्या आईने तिला तात्काळ रुग्णालयात नेले. पण डॉक्टरांनी तिला मृत घोषीत केले. या घटनेमध्ये कुत्रा देखील जखमी झाला आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली. सीसीटीव्ही व्हिडीओमध्ये दिसत आहे की, एक चिमुकली आपल्या आईसोबत रस्त्यावरून चालली आहे. मुलगी आईच्या पुढे दिसत आहे.

# सिद्धीविनायक मंदिर सुशोभिकरण, भाविकांसाठी सुविधा या कामांना गती द्यावी: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**मुंबई :** श्री सिद्धीविनायक मंदिरात येणाऱ्या भाविकांना उत्कृष्ट दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सुशोभिकरणाच्या कामाला गती द्यावी. या कामाचा शुभारंभ आगामी गणेश चतुर्थीच्या दिवशी व्हावा यासाठी नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर परिसर सुशोभिकरण व सोयी-सुविधांसंदर्भात कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, श्री सिद्धिविनायक न्यासाचे अध्यक्ष आमदार सदा सरवणकर, माजी खासदार राहुल शेवाळे, मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी आदी उपस्थित होते.

श्री सिद्धीविनायक सुशोभिकरणासाठी मुंबई महापालिकेमार्फत पाचशे कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार असून, या कामासंदर्भात आज मुख्यमंत्र्यासमोर सादरीकरण करण्यात आले. यात्रीनिवास, मंदिराच्या परिसरात पाच किलोमीटरच कॉरिडॉर, दुकाने, पार्कींग, भाविकांसाठी दर्शन रांग त्यातील सुविधा आदी विविध बांबीसंदर्भात सादरीकरणात माहिती देण्यात आली.



जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, तहसिलदार प्रदीप कुडाळ यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

# कल्याणमध्ये भाजपला धक्का, डोंबिवलीत पदाधिकाऱ्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश होणार



**कल्याण** - लोकसभानंतर राज्यात विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. निवडणुका जशा जवळ येत आहेत, तसे नेत्यांनी पक्षांतर सुरु केलेय. सत्ताधारी भाजपमधील काही नेते काँग्रेसमध्ये जात असल्याचे समोर आलेय. कल्याण डोंबिवलीतील भाजपचे अनेक पदाधिकारी काँग्रेसच्या वाटेवर आहेत. या पदाधिकाऱ्यांकडून कल्याणमध्ये काँग्रेसला नव संजीवनी मिळणार आहे.

राज्यभरात लोकसभा निवडणूकित मिळालेल्या यशानंतर कल्याण डोंबिवलीतील काँग्रेसची घरघर थांबल्याचे दिसून येतेय. गेल्या काही वर्षांत काँग्रेस सोडून भाजप व इतर पक्षात गेलेले काँग्रेसचे पदाधिकारी पुन्हा घरवापसी करत काँग्रेस पक्षात परतत आहेत. दोन दिवसांपूर्वी मनसे कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता, त्या पाठोपाठ आता भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष राकेश मुथा हे देखील काँग्रेस प्रवेश करणार आहेत. मुंबईत प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा होणार आहे.

राकेश मुथा यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात काँग्रेस पक्षांकडून केली होती, ते कल्याण डोंबिवलीत युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते. मात्र 2016 मध्ये त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून काही ठराविक जणांनाच संधी दिली जाते,भेदभाव केला जातो ,वरिष्ठ पदाधिकारयामुळे पक्षात काम करण्यास संधी मिळत नसल्याने मी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश करणार घेतल्याचे मुथा यांनी सांगितले. तर काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी राकेश मुथा एकटेच नाही तर भाजपसह इतर पक्षातील अनेक पदाधिकारी कार्यकर्ते काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचे सांगितले. उद्या नाना पटोले यांच्या उपस्थितीत प्रवेश होणार आहे. येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवलीतील चार मतदार संघामधील कल्याण पूर्व आणि कल्याण पश्चिम या जागा आम्हाला मिळाव्यात अशी मागणी पक्ष श्रेष्ठीकडे करनार असल्याचा पुनरुच्चार जिल्हाध्यक्ष पोटे यांनी केला. काँग्रेसमध्ये इनकमिंग सुरू झाल्याने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली परिसरात काँग्रेस पक्षाला नवी संजीवनी मिळत असल्याची चर्चा आहे.

# India maintaining wait-and-watch strategy, Army on alert, S Jaishankar informs all-party meet



**Delhi** - India is maintaining a wait-and-watch strategy on Bangladesh while keeping its Army on the alert, External Affairs Minister S Jaishankar said at an all-party meeting held in Parliament on Tuesday about the ongoing developments in the neighbouring country.

A day after Bangladesh Prime Minister Sheikh Hasina resigned and fled the country after hundreds were killed in a crackdown on agitations that began with protests against job quotas, Jaishankar on Tuesday spoke on the possible impact the developments could have on India and spoke about what strategy would be if there was interference from outside, sources said.

When Rahul Gandhi, the leader of the Opposition in the Lok Sabha, asked if the government had any information about the role of any outside forces in the Bangladesh developments, Jaishankar said the government only has "information about a Pakistan diplomat's changed DP that shows his support to the uprising", sources said.

# Guess what we found in Pune? Some roads without potholes ! Here's how



**Pune** - Gone are the days when roads with potholes made news. Today, roads without potholes are the real headline-grabbers. Team IE set out in different directions to find a few of these in Pune, and after days of scouring the city, we came across a few roads that, believe it or not, did not have any potholes for at least a 1 km stretch. So here are the most newsworthy roads of Pune, roads that have a striking feature that hundreds of their counterparts do not – no potholes. We asked the people who built these roads how they did it and discovered it was not rocket science, just pure and straightforward adherence to road construction principles. Neatly maintained footpaths on both sides, well-kept channels for the passage of water along the roads, proper signages, and above all, not a single pothole. Though it sounds unlikely, this is the description of a road in Pune, a city otherwise plagued with pothole-ridden roads. The 1.8 km stretch from Pashan Circle to Ramnagar Highway Link Road on the Pashan NDA Road, which has been constructed by the Military Engineering Services (MES), stands out as a welcome exception. The stretch connects the Armament Estate which houses various Defence Research and Development Organisation (DRDO) facilities in Pashan to the Ramnagar area of Bavdhan.

# टिटवाळा उपविभागात जुलै महिन्यात १२२ वीज चोरांविरुद्ध कारवाई

## ४६ लाखांची वीजचोरी उघड



**कल्याण:** टिटवाळा उपविभागात वीज चोरांविरुद्ध धडक मोहीम सातत्याने सुरू आहे. गत जुलै महिन्यात उपविभागातील मांडा, गावेली, कोन आणि खडावली शाखा कार्यालयांतर्गत १२२ जणांवर धडक कारवाई करून ४६ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली. कारवाईनंतर वीजचोरीच्या देयकाचा मुदतीत भरणा टाळणाऱ्या १२२ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार मुरबाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. जुलै महिन्यात मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत ५४ जणांकडे १७ लाख रुपये, कोनगाव शाखा परिसरातील २९ जणांकडे १६ लाख ४६ हजार रुपये, गोवेली शाखा कार्यालयाच्या अंतर्गत २४ जणांकडे ९ लाख ५१ रुपये आणि खडावली शाखा परिसरातील १५ जणांकडे ३ लाख ६१ हजार रुपयांची वीजचोरी आढळून आली. या सर्वांना वीजचोरीचे देयक व तडजोड रक्कम भरण्याबाबत नोटिस बजावण्यात आली. परंतू विहीत मुदतीत सदर रकमेचा भरणा टाळल्यामुळे या सर्वांविरुद्ध दिलेल्या फिर्यादनुसार मुरबाड पोलीस ठाण्यात वीजचोरीचे गुन्हे दाखल झाले आहेत. उपकार्यकारी अभियंता गणेश पवार यांच्या नेतृत्वाखाली सहायक अभियंते तुकाराम घोडविंदे, धनंजय पाटील व अभिषेक कुमार तसेच कनिष्ठ अभियंते अलंकार म्हात्रे आणि सचिन पवार यांच्या चमुने ही कामगिरी केली. वीजचोरी हा गंभीर स्वरुपाचा सामाजिक गुन्हा असून या गुन्ह्यात कडक शिक्षा व दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. त्यामुळे कोणतीही युक्ती वापरून वीजचोराचा प्रयत्न करू नये, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# Central Railway's plan to launch 10 services from Dadar delayed



**Mumbai** - The Central Railway's plan to introduce 10 local services from Dadar Station since August has been delayed due to constraints of fifth and sixth lines. Currently, these services originate from the Chhatrapati Shivaji Maharaj Terminus. A source in the Central Railway revealed that the plan was to use platform number 11 at Dadar for these 10 services. However, since the fifth and sixth lines extend only up to Kurla, trains would need to cross all tracks serving other platforms at Dadar to access platform number 11. This would potentially disrupt the punctuality of other trains. The services from platform number 11 at Dadar station were expected to better serve commuters traveling to and from Dadar, offering a more convenient option compared to traveling from CSMT. At present, a few services already operate from platform number 11.

## रत्नागिरीत हिट अँड रन; व्हॅगनार गाडीने दोन गाड्यांना ठोकले



● रत्नागिरी, (प्रतिनिधी):

मद्यधुंद अवस्थेत तरुणाने दोन गाड्यांना ठोकर मारली. रत्नागिरीतील माळनाका ते सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयादरम्यान "हिट अँड रन"चा हा प्रकार मंगळवार ६ ऑगस्टला रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास घडला.

रत्नागिरी औद्योगिक वसाहतीत राहणारा आरिफ पठाण या तरुणाने दारू पिऊन लांजामधील डॉक्टर सुहास देसाई यांच्या मालकीची व्हॅगनार गाडी क्रमांक एमएच ०८ एएन ०८१८ घेऊन दोन गाड्यांना धडक मारली. आरिफ हा मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता. मात्र त्याच्या ताब्यात असलेली गाडी अनियंत्रित झाल्याने त्याने दोन वाहनांना ठोकर मारली. यामध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नसली तरीही मोठी दुर्घटना होता होता टळली, असे घटनास्थळी असणाऱ्या लोकांनी सांगितले.

यावेळी मोठा जमाव गोळा झाल्याने या जमावाने आरिफ याला चांगलाच चोप दिला. त्यानंतर जमावाने त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याची आरोग्य तपासणी करण्यात आली असता तो जास्त मद्य प्राशन केले असल्याचे निष्पन्न झाले.

## हवाबंद डब्यातील मिठाईत बुरशी, हल्दीराम स्टोअरला...




● यवतमाळ, (प्रतिनिधी):

येथील हल्दीरामच्या स्टोअरमधून मिठाई घेतल्यानंतर हवाबंद डब्यातील मिठाई बुरशीयुक्त आढळली. वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्षासोबतच हा प्रकार घडल्याने प्रकरणाने गंभीर वळण घेतले. या प्रकरणी अन्न व औषध विभागाकडे तक्रार करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाने तत्काळ पावले उचलत यवतमाळ येथील हल्दीराम स्टोअरला कारणे दाखवा नोटीस बजावली. शहरातील महादेव मंदिर रोड परिसरात हल्दीराम स्टोअर ओम इंडस्ट्रीज इंडिया प्रा. लि. मार्फत चालविल्या जाते. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष नीरज वाघमारे यांनी मंगळवारी या स्टोअरमधून काजू चॉकलेट रोल ही मिठाई घेतली. त्यासाठी ३०५ रूपयाचे बील ऑनलाइन दिले. घरी गेल्यानंतर त्यांची मुलगी ही मिठाई खात असताना त्यात बुरशी आढळली.

# राज्यातील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे रुपांतर बॅरेजेसमध्ये करून पाणी साठवण क्षमतेत वाढ करावी - उपमुख्यमंत्री अजित पवार

● मुंबई, (प्रतिनिधी):



राज्यातील जनतेला पिण्यासाठी आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होण्यासाठी अस्तित्वातील प्रकल्पांची क्षमतावाढ करणे गरजेचे आहे. नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करून एका प्रकल्पातील अतिरिक्त पाणी दुसऱ्या प्रकल्पात नेण्याचे नियोजन करावे, त्यातून सिंचन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. त्यादृष्टीने आवश्यक ठिकाणी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे रुपांतर बॅरेजेसमध्ये करून पाणी साठवण क्षमतेत वाढ करण्याची कार्यवाही गतीने करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले.

सोलापूर, कोल्हापूर, हिंगोली, बीड या जिल्ह्यांतील जलसंपदा विभागाशी संबंधित विविध प्रलंबित योजनांसंदर्भातील वित्तीय व अन्य प्रश्नांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठक झाली. बैठकीस आमदार बबनराव शिंदे, राजेश पाटील, संजय शिंदे, बाळासाहेब आजबे, यशवंत माने, चंद्रकांत नवघरे, माजी आमदार अमरसिंह पंडित, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. दीपक कपूर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, लाभक्षेत्र विकास विभागाचे सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, गोदावरी मराठवाडा विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार आदी उपस्थित होते. कोल्हापूर, सोलापूर, हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि इतर संबंधित वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, राज्यातील विविध सिंचन प्रकल्पांच्या दुरूस्तीसाठी निधीची आवश्यकता आहे. काही मध्यम सिंचन प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरत नसल्याने उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासते, तर काही प्रकल्पांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी पावसाळ्यात लघु व मध्यम सिंचन प्रकल्प इतर स्त्रोताद्वारे भरून घ्यावेत. नागरिकांना उन्हाळ्यामध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी जलसंपदा विभागाने वित्त विभागाशी समन्वय ठेवून कार्यवाही करावी.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, गडहिंग्लज तालुक्याच्या पूर्व भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी किटवडे प्रकल्प आंतरराज्य प्रकल्प म्हणून पूर्णत्वास येणे आवश्यक असून यामध्ये साठवण क्षमता वाढविल्यास त्याचा कर्नाटकसह गडहिंग्लज तालुक्यातील पूर्व भागाला फायदा होऊ शकतो. त्यातून या भागातील नागरिकांना पिण्याचे व सिंचनाचे पाणी मिळण्यास मदत होईल. याबाबत जलसंपदा विभागाने कर्नाटक शासनाशी पत्रव्यवहार करून जलदगतीने कार्यवाही करावी.

सोलापूर जिल्ह्यातील भीमा-सीना नदीवरील जुन्या पद्धतीच्या कोल्हापूर बंधाऱ्यांचे बॅरेजेसमध्ये रूपांतर करण्याबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांच्या समितीच्या अहवालानुसार अभिप्राय मागविण्यात आले आहेत. प्राथमिक अहवालाचा अभ्यास करून आता त्यासाठी सर्वेक्षण करण्यात यावे. खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना, सीना नदीवरील बोपले, शिरापूर येथेही नवीन बॅरेजेसच्या कामांना मंजुरी देण्यात येत असून येथील सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. या कामांना राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी. मोहोळ तालुक्यातील आष्टी उपसा सिंचन योजनेमधून वंचित राहिलेल्या अनगरसह ९ गावांच्या विस्तारित योजनेला तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे पाठविण्यात आला आहे. त्यालाही मान्यता घेऊन गतीने कार्यवाही करावी. सीना नदीवरील आष्टी तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीच्या खडकत क्र. १ व २, सांगवी नागापूर व संगमेश्वर, पिंपळसुट्टी तालुक्यातील पिंपरीघुमरी व कर्जत, दिघी, निमगाव डाकू व गांगर्डा आणि जामखेड तालुक्यातील चौंडी अशा १० प्रकल्पांचे बॅरेजेसमध्ये रुपांतर करण्याची पुढील कार्यवाही गतीने करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिले.

बीड जिल्ह्यातील शिरूर (कासार) येथील ब्रम्हनाथ येळंब आणि निमगाव या बंधाऱ्यांचेही बॅरेजमध्ये रूपांतर करण्यासाठी आराखडा तयार करून नियोजन आणि वित्त विभागाला सादर करावा. कडा, कडी, मेहकरी प्रकल्पांच्या विशेष दुरूस्तीसाठी प्रशासकीय पातळीवर खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून विभागाच्या सेव्हिंगमधून खर्च करावेत. शिवाय पावसाळ्यात कामे होणे शक्य नसल्याने आराखडा तयार करून नाबार्डच्या प्रकल्पामध्ये खर्चाचे नियोजन करावे. नाबार्डने दिलेल्या १५ हजार कोटी अर्थसंकल्पातून लहान प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करा. त्यासाठी लागणारी वाढीव तरतूद त्यातून मंजूर करण्यात यावी. मात्र, खर्चाचे प्रमाण फार वाढणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, लोकप्रतिनिधींच्या मागण्यांचा विचार करून औंढा तालुक्यातील (जि. हिंगोली) केळी लघु तलावाचे पुनरुज्जीवन करून उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे. येलदरी धरणातील मृत साठ्यातील पाणी केवळ पिण्यासाठी सिद्धेश्वर धरणात सोडावे, तेथून केळी तलाव भरून घ्यावा. सिद्धेश्वर धरणात तांत्रिक अडचणी दूर करून नवीन पाणीसाठा वाढण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# जे एन पी ए रोडवर अपघात एकाचा मृत्यू, दोघे जखमी

● रत्नागिरी, (प्रतिनिधी):

**उरण** - करळ फाटा ते जे एन पी ए या मार्गावर नागरिकांची रहदारी सुरक्षित पणे होण्यासाठी, अनेक उड्डाण पुल बांधण्यात आले आहेत तरीही ट्रेलर च्या बेशिस्त वाहतुकीमुळे उरण परिसरात अपघातांचे प्रमाण काही केल्या कमी होत नाहीत. मग तो दास्तान ते दिघोडे चिरनेर मार्ग असो वा खोपटा ते उरण रस्ता असो अपघातांचे सातत्य चालूच आहे.

आज दिनांक ७ रोजी जे एन पी ए रोडवरील पी यु बी न्हावा शेवा कस्टम ऑफिस नजिकच्या रोडवर सकाळी सात वाजण्याच्या च्या सुमारास रिक्षा व ट्रेलर चा भिषण अपघात झाला आहे.

सदरच्या अपघाताचे सविस्तर



वृत्त असे की रात्रपाळी करून भरत ठाकूर केळवणे, भोम येथील सचीन म्हात्रे आणि आकाश चौगुले हे तिघे रिक्षातून घरी येत असताना पी यु बी येथे आले असता समोरून येणाऱ्या भरधाव ट्रेलर ने रिक्षास जोरदार धडक दिली यामध्ये भरत ठाकूर जाग्यावरच मयत झाले तर सचीन म्हात्रे, आकाश चौगुले यांस गंभीर मार लागला आहे. सदरचा अपघात पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष अनिकेत वसंत तांडेल हे ड्युटीवर जात असताना त्यांनी प्रत्यक्ष पाहीला व त्यांनी त्यांच्या संपर्कातील न्हावा शेवा पोलिस स्टेशनचे पी एस आय दिपक दाभाडे यांना संपर्क साधला असता त्यांनी पोलीस व ॲब्युलन्स पाठवतो असे सांगितले. यावेळी डीपी वल्ड ची रुग्णवाहिका येऊन अपघात ग्रस्त तिनही व्यक्तींना जे एन पीए हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले यावेळी भरत ठाकूर हे मयत झाल्याचे सांगण्यात आले. सचीन म्हात्रे व आकाश चौगुले यांना पुढील उपचारासाठी वाशी येथील एम जी एम

## नेपाळमध्ये हेलिकॉप्टर कोसळलं, ५ प्रवाशांचा मृत्यू

● नवी दिल्ली, (प्रतिनिधी):




नेपाळमधील नुवाकोटमध्ये हेलिकॉप्टरला कोसळल्याची घटना घडलीय. या अपघातात ४ ते ५ जणांचा मृत्यू झालाय. रसुवाला जाणाऱ्या या हेलिकॉप्टरमध्ये फक्त पाच जण होते असे सांगण्यात येत आहे. यातील चार जण चीनचे नागरिक होते. गेल्या काही दिवसापूर्वी त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका विमानाचा अपघात झाला होता. यात १८ जणांचा मृत्यू झाला होता. ही विमान कोसळण्याची दुर्घटना २४ जुलै रोजी घडली होती.

खराब व्यवस्थापनामुळे नेपाळमध्ये विमान अपघात होत असल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान हेलिकॉप्टर कोसळण्याची घटना जेथे घडली होती तेथे मदत आणि बचावकार्य सुरू आहे. ही घटना आज घडल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नेपाळमधील नुवाकोटमधील शिवपुरी भागात या हेलिकॉप्टरला अपघात झाला. यामध्ये एअर डायनेस्टीचे हेलिकॉप्टर कोसळले. विमानातील सर्व ५ जणांचा मृत्यू झाला. त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एका सूत्राने हिमालयन टाईम्सला सांगितले की, हेलिकॉप्टर काठमांडूहून निघाले होते आणि सयाफ्रुबेन्सीकडे जात असताना ते क्रॅश झाले.

## पालिका कार्यालयांत आमदारांच्या फेऱ्या

● मुंबई, (प्रतिनिधी):



विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे मुंबईतील विद्यमान आमदारांची धावपळ सुरू झाली असून आमदार आपापल्या मतदारसंघात जनसंपर्क वाढवण्यावर भर देऊ लागले आहेत. त्याचबरोबर महापालिका स्तरावरील प्रश्न सोडविण्यासाठी पालिका विभाग कार्यालय, मुख्यालयात आमदारांच्या फेऱ्या वाढल्या आहेत. विधानसभेची निवडणूक ऑक्टोबर महिन्यात होणार असून सप्टेंबर महिन्यापासून निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईतील विद्यमान आमदार पुन्हा एकदा कामाला लागले आहेत. नगरसेवकांची मुदत संपल्यामुळे पालिका स्तरावरील प्रश्न घेऊन आमदार कार्यकर्त्यांच्या ताफ्यासह महापालिका मुख्यालय, पालिकेच्या विभाग कार्यालयात येऊ लागले आहेत. फेरीवाला धोरणाची अंमबजावणी अनेक ठिकाणी सुरू झाल्यामुळे हा मुद्दा आमदारांनी उचलून धरला आहे.

भाजपचे आमदार आशिष शेलार यांनी सोमवारी महापालिका मुख्यालयात येऊन पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतली. शेलार यांच्यासोबत भाजपच्या दहिसरमधील आमदार मनीषा चौधरी आणि मुलुंडमधील आमदार मिहीर कोटेचा हेही होते. शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनीही सोमवारी पालिका आयुक्तांची भेट घेतली. सागरी किनारा मार्गालगतच्या जाहिरात फलकाला विरोध करण्यासाठी ठाकरे यांनी आयुक्तांची भेट घेतली. आदित्य ठाकरे यांनी वरळीतील विविध प्रश्नांसबंधी पालिका आयुक्तांना सात पत्रे दिली आहेत. मुंबईतील अनेक आमदारांनी आपापल्या मतदारसंघात जनसंपर्क वाढविण्यास सुरुवात केली आहे. आरोग्य शिबिरांचे आयोजित करणे, विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणे, विविध कामांच्या लोकार्पण सोहळयाच्या निमित्ताने नागरिकांच्या भेटीगाठी घेण्यावर भर दिला जात आहे. पालिकेच्या ज्या धोरणांना नागरिकांचा विरोध आहे असे मुद्दे उचलून धरले जात आहेत. दहिसरची जागा धारावी प्रकल्पासाठी देण्याकरीता दहिसरच्या आमदार मनीषा चौधरी यांनी विरोध केला होता. तर दहिसरमधील माजी आमदार विनोद घोसाळकर यांनीही या प्रकल्पाला विरोध दर्शवला होता.

## महाराष्ट्रातील कांद्याला बांग्लादेशची सीमा ३२ तासानंतर खुली, निर्यातदारांना बँकांचे व्यवहार सुरळीत होण्याची प्रतिक्षा

● नाशिक, (प्रतिनिधी):



बांग्लादेशातील हिंसाचारामुळे सीमेवर अडकलेल्या कांद्याच्या मालमोटारींना ३२ तासानंतर प्रवेश मिळण्यास सुरुवात झाल्याने तूर्तास निर्यातीतील अडथळे दूर झाले आहेत. बांग्लादेशातील बँकांकडून शाश्वती (बँक गॅरंटी) घेऊन निर्यातदार कांदा पुरवतात. सध्या तेथील बंद असणाऱ्या बँका दोन-तीन दिवसांत सुरू होतील. त्यामुळे कांद्यासह अन्य कृषिमालाची निर्यात सुरळीत होईल, असे भारतीय फलोत्पादन निर्यातदार संघटनेने म्हटले आहे. बांग्लादेशातील हिंसाचार व राजकीय अराजकतेची झळ भारतीय, त्यात प्रामुख्याने महाराष्ट्रातील कांद्याला बसली. भारत-बांग्लादेश दरम्यानची सीमा बंद झाल्यामुळे कांदा घेऊन निघालेल्या सुमारे ७० ते ८० मालमोटारी अडकल्या होत्या. सीमेवरील स्थिती लक्षात घेत व्यापाऱ्यांनी तूर्तास बांग्लादेशकडे नव्याने माल न पाठवण्याचे ठरवले. सोमवारी दुपारपासून भारत-बांगलादेश दरम्यानची सीमा बंद झाली होती. बांग्लादेश भारतीय कांद्याचा मोठा खरेदीदार आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय




● मुंबई, (प्रतिनिधी):

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता; पावणे चार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार आता प्रकल्पबाधितांना सदनिका मिळणार. धोरणास मान्यता लहान शहरांतील पायाभूत सुविधांना वेग येणार; कर्ज उभारण्यास मान्यता आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ. अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर होणार. अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजार रुपये दंड महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण राबविणार. पाच वर्षात तीस हजार कोटींचे उत्पन्न मिळणार कागल येथे आयुर्वेद महाविद्यालय ; आजरा तालुक्यात योग व निसर्गोपचार महाविद्यालय न्यायमूर्ती, मुख्य न्यायमूर्तींना सेवा निवृत्तीनंतर घर कामगार, वाहनचालक सेवा सेना कल्याण शैक्षणिक संस्था आणि राधा कल्याणदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टला मुद्रांक शुल्कात १०० टक्के सूट जुन्नरच्या श्री कुकडेश्वर आदिवासी हिरडा औद्योगिक सहकारी संस्थेस अर्थसहाय्य ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविणार.अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकविणार. विविध कार्यक्रमांचे आयोजन अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेस मंजुरी

# रमाबाई आंबेडकर नगर पुनर्विकास, १४ हजार ४५४ झोपड्यांचेच पुनर्वसन

● मुंबई, (प्रतिनिधी):

घाटकोपरमधील माता रमाबाई आंबेडकर नगर पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत येथील १६,५७५ पैकी आता १४,४५४ झोपड्यांचेच पुनर्वसन केले जाईल. उर्वरित झोपड्या किनारपट्टी नियंत्रण नियमावलीत (सीआरझेड) बाधित असल्याने त्या वगळण्यात आल्या आहेत. प्रकल्पात समाविष्ट झोपड्यांच्या पात्रता निश्चितीचे काम वेगात सुरू असून आजवर ८,५५५ झोपड्या पात्र ठरल्या आहेत.मुंबई महागर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) पूर्वमुक्त मार्गाचा छेडानगर-ठाणे दरम्यान विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. विस्तारीकरणात रमाबाई नगरातील १,६९४ झोपड्या बाधित होत आहेत. या झोपड्यांसह संपूर्ण रमाबाई नगरातील झोपड्यांचा एमएमआरडीए



आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण संयुक्त भागीदारी तत्वावर पुनर्विकास करणार आहे. त्यानुसार झोपुने झोपड्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. या सर्वेक्षणाप्रमाणे रमाबाई आंबेडकर नगरातील १६,५७५ पैकी १४,४५४ झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती झोपुतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. उर्वरित झोपड्या किनारपट्टी नियंत्रण नियमावलीत मोडत असल्याने त्यांना वगळण्यात आल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रकल्पात समाविष्ट १४,४५४ झोपड्यांपैकी आजवर ८,५५५ झोपड्या पात्र ठरल्या असून ५,८९९ झोपड्यांची पात्रता निश्चिती झालेली नाही, असे त्यांनी सांगितले.पात्रता निश्चिती झालेल्या झोपडीधारकांबरोबर करार करण्याची कार्यवाही 'एमएमआरडीए'च्या माध्यमातून सुरू आहे. आतापर्यंत अंदाजे दोन हजार झोपडीधारकांबरोबर करार झाल्याचे समजते. आता उर्वरित झोपड्यांच्या पात्रता निश्चितीला वेग देण्यात येणार आहे. शक्य तितक्या लवकरच पात्रता निश्चिती पूर्ण करून झोपड्या रिकाम्या करण्यात येणार आहेत. झोपु प्राधिकरण रिकामी झालेली जागा 'एमएमआरडीए'कडे वर्ग केली जाईल.धनादेशाच्या रक्कमेचे वाटप झाल्यानंतर झोपुकडून तात्काळ झोपड्या रिकाम्या करून घेण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात ४,०५३ झोपड्या रिकाम्या करून घेण्यात येणार आहेत. झोपड्या रिकाम्या केल्यानंतर त्या हटवून जागा मोकळी करून ती एमएमआरडीएकडे वर्ग करण्यात येणार आहे.

### १९ ऑगस्टला धनादेश

पहिल्या टप्प्यात ४,०५३ झोपड्या हटवून जागा रिकामी करून घेण्यात येणार आहेत. 'क्लस्टर एन-१९'मधील या झोपड्या असून आता करारनामा झालेल्या पात्र झोपडीधारकांना घरभाड्याचा धनादेश वितरीत केला जाणार आहे. घाटकोपर येथे १९ ऑगस्ट रोजी एक कार्यक्रम होणार असून त्यात प्रातिनिधिक स्वरूपात २०० जणांना धनादेशाचे वाटप करण्यात येणार आहे.

### घरभाडे रक्कम

- निवासी – १५ हजार रुपये प्रति माह
- अनिवासी – २५ हजार रुपये झोपडपट्टीच्या आतील दुकानांसाठी
- ३० हजार रुपये प्रतिमाह अंतर्गत रस्त्यावरील दुकानांसाठी
- ३५ हजार रुपये प्रतिमाह महामार्गावरील दुकानांसाठी